**प्रकरण पहिले**

# प्रस्तावना, संशोधनाचा विषय, पद्धती, उद्दिष्ट्ये व साहित्य सर्वेक्षण

## अनुक्रमणिका


१. प्रस्तावना

२. संशोधन विषयाची निश्चिती

३. संशोधन विषयाचे महत्त्व

४. संशोधन विषयाची पद्धती

५. संशोधनाची उद्दिष्टे

६. गृहीतके

७. संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र

८ साहित्य सर्वेक्षण : पूर्व संशोधन अभ्यासाचा आढावा

९. संकल्पनांचे विश्लेषण

१०. संशोधनाची साधने

११. संशोधन विषयाची प्रकरणनिहाय योजना

१२. संशोधनाच्या मर्यादा आणि अनुभव

## १.१ प्रस्तावना :

आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन विकासाचा आणि चळवळींचा अभ्यास करताना १९ व्या शतकातील विविध प्रबोधनाच्या चळवळींचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि म्हणूनच गेल्या शंभर– दीडशे वर्षांच्या इतिहासाचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. भारतावर ज्याप्रमाणे अनेक प्रकारच्या राजवटींनी राज्य केले, त्यामुळे भारतातील जनजीवन ढवळून निघाले. भारतातील सर्वसामान्य माणूस शेकडो वर्षांपासून जाती–जमातींच्या पिंजऱ्यात खितपत पडलेला, दैववादी, गुलामी प्रवृत्तीने जगणारा, जातीय व आर्थिक विषमता प्रमाण मानणारा, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रांतील स्वातंत्र्य आणि अधिकारापासून वंचित असणारा, अशिक्षित, वैज्ञानिक दृष्टिकोन नसलेला, अंधश्रद्धाळू, रुढी परंपरावादी असल्याने चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या समाजाने सर्वसामान्य दीनदुबळ्या अशा समाजावर अधिकाराने राज्य केले. त्यांची सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीद्वारे पिळवणूक केली. देव, धर्म आणि भ्रमित करणारी सामाजिक सांस्कृतिक मुल्य आणि भ्रांतवादी कल्पना मांडून इथल्या सामान्य शोषित समाजास लुटून दुबळे केले. प्रामुख्याने सर्वसामान्य अशा बहुजन समाजाचे धिंडवडे मोठ्या शिताफीने काढले गेले. ही महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये घडलेली फार मोठी शोकांतिका आणि दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. येथे अनेक जुलमी राजवटी आल्या व त्यांनी राज्य केले. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी मात्र स्वराज्य स्थापनेचे धोरण यशस्वी करून सामाजिक आणि राजकीय समतेवर आधारित आर्थिक क्षेत्रात शोषणरहित असे एक मानवतावादी मानवी समानतेचे धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजेच सर्वसामान्य माणसांचे स्वराज्य निर्माण केले.

त्यानंतरच्या पेशवाईत मात्र महाराष्ट्रातील सर्वसामान्यांची अधोगती झाली. धार्मिक, राजकीय, सामाजिक विषमतेने महाराष्ट्रातील जनतेची अधोगती झाली. त्या नंतर ब्रिटिश राजवटीने प्रचंड प्रमाणात देशाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक शोषण केले. त्याच परिस्थितीत ख्रिश्चन धर्मप्रसारालाही सुरुवात झाली. परकीय राजवट आणि ख्रिश्चन धर्माच्या हल्ल्यांचा परिणाम येथील समाजमनावर झाला. इंग्रजांच्या राजकीय सामर्थ्याला आव्हान देण्याची शक्ती आपल्यात निर्माण करण्यासाठी प्रथम आपल्या समाजात व स्थानिकांच्या धर्मात सुधारणा झाली पाहिजे, आपल्या समाजाचे सर्वांगीन प्रबोधन करून समाजाला जागृत केले पाहिजे याची जाणीव भारतातल्या काही शिकल्या–सवरलेल्यांना होऊ लागली. ख्रिश्चन धर्म प्रसाराला जर रोखून धरायचे असेल तर प्रथम आपल्या हिंदू धर्माच्या समाजात सुधारणा केली

पाहिजे या विचाराने भारावलेली पिढी निर्माण झाली. हिंदू धर्म व समाज यांची सुधारणा करायची झाली तर त्यात अनेक शतकांपासून निर्माण झालेले दोष, अमानवीय अशा अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, विषमता, वादविवाद आणि दैववादी दृष्टिकोन दूर केले पाहिजेत याची जाणीव धर्मसुधारक व आणि समाजसुधारकांना होऊ लागली. इंग्रजी राजवटीने प्रशासनाला लागणाऱ्या कर्मचारी वर्गासाठी भारतात पाश्चिमात्य पद्धतीच्या शिक्षणाची सुरुवात केली. या शिक्षणात पाश्चात्य अशा आधुनिक ज्ञान, विज्ञान व संस्कृतीचे शिक्षण देणे सुरू केले होते. भारतीयांनी ते ज्ञान आत्मसात करणे सुरु केले व खऱ्या–खोट्यांची त्यांना हळूहळू जाणीव होऊ लागली. पाश्चात्य संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, राजकीय ज्ञान–विज्ञान आणि स्वातंत्र्य यांचा परिचय होऊ लागल्याने बऱ्या–वाईटांची जाणीव सर्वसामान्यांना होऊ लागली. यातूनच भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळींना प्रारंभ झाला.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळींत आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळीत इतकेच नव्हे तर भारतीय समाज जीवनाच्या इतर विविध क्षेत्रांतही महाराष्ट्रातील काही नामवंत समाजसुधारक व नेत्यांनी सर्व प्रकारच्या प्रगतीचे, सुधारणांचे नेतृत्व केले आहे. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचा समावेश करावा लागेल. अशा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक,आर्थिक आणि धार्मिक अशा स्वरूपाच्या सुधारणांच्या चळवळींत उक्तीसोबत कृतीनेही कार्य करणारे थोर क्रांतिकारी समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्थापन केलेल्या ‘सत्यशोधक समाज’ या सामाजिक संस्थेच्या चळवळीचा सूक्ष्म व बारकाईने अभ्यास करणे आणि त्याद्वारे महात्मा फुल्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे आवश्यक असल्याने या संशोधन अभ्यासातून तो स्थूलपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये ’सत्यशोधक समाज’ या संघटनेची अत्यंत व्यापक भूमिकेतून स्थापना केली. या संघटनेच्या स्थापनेची आवश्यकता, तिची तत्त्वप्रणाली, तिची साधने, तिची वाटचाल, तिचे कार्य आणि या संघटनेची ध्येयधोरणे, या संघटनेचे नेते – नेतृत्व व त्यांचे योगदान आणि या संघटनेच्या कार्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला प्रभाव आणि राजकीय प्रक्षांच्या बांधणीवर त्यांच्या विचारसरणीवर पडलेला प्रभाव याचा शास्त्रशुद्ध अभ्यास करावा यासाठी या संशोधन प्रबंधाच्या अभ्यासाचे नियोजन केले आहे. कारण या संघटनेने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतीय राजकारणावर, समाजकारण, धर्मकारण, शेती व अर्थकारण, शिक्षण आणि संस्कृती इत्यादी क्षेत्रांत मूलभूत असे

सकारात्मक परिणाम केले आहेत व आजही या संघटनेच्या तत्त्वप्रणालीला सर्वांनीच अशी राजमान्यता दिलेली आहे. म्हणून हा अभ्यास मूलगामी स्वरूपाचा झाला आहे असे वाटते.

'सत्यशोधक समाज : तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव' या विषयाच्या अनुषंगाने केलेले संशोधन हे सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांशी व नेतृत्व गुणांशी संबंधित असल्याने समाजाची विस्कटलेली घडी, समाजाची जडणघडण करण्यासाठी केलेले कार्य आणि या संघटनेचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडलेला राजकीय प्रभाव हा समाजाला आणि समाजातील सर्व घटकांना कसा प्रेरणादायी ठरला याचा स्थूल अभ्यास या संशोधनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

समाज हा परिवर्तनशील असतो. कोणतीही सत्ता दीर्घकाळपर्यंत टिकून राहत नसते. कोणत्याही चळवळी या कालांतराने मोठ्याही होत असतात आणि नंतर काही लोपही पावत असतात. पण समाजाचे हित जोपासणाऱ्या समाजाशी बांधीलकी असणाऱ्या संपूर्ण मानवी समाजाच्या अंतकरणामधून कायमची जागा घेणाऱ्या व समाजातील वास्तवाचा शोध घेऊन समाजाला योग्य दिशेला घेऊन जाणाऱ्या चळवळी या खऱ्या अर्थाने अजरामर ठरत असतात. अशा प्रकारची ऐतिहासिक चळवळ म्हणजे ''सत्यशोधक समाज'' ही चळवळ होय. ही चळवळ महात्मा फुल्यांनी सुरु केली आणि समाजाला नवी दिशा आणि नवे आयाम दिले. 'सत्यशोधक समाजाच्या' या चळवळीमध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, भगवंतराव पाळेकर, नारायण मेघाजी लोखंडे, केशवराव विचारे, राजर्षी शाहू महाराज, महर्षि विठ्ठल, रामजी शिंदे, महाराजा सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, दिनकरराव मोरे, तानुबाई बिर्जे, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, भास्करराव जाधव, माधवराव बागल, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे आदी काही प्रमुख विचारवंत, समाजसुधारक व नेत्यांनी बहुजन समाजाच्या सर्व क्षेत्रांतील प्रश्नांना या सत्यशोधक समाजाच्या चळवळीद्वारे वाचा फोडण्याचे महान कार्य केले. समाजातील रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता व परंपरेने चालत आलेल्या अनिष्ट प्रथा समाजाला कशा घातक आहेत हे त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला विविध शहरे, खेडोपाडी व विविध गावांना फिरुन व्याख्याने, सभा, बैठका, जलसे, शिक्षण इत्यादीच्या माध्यमातून आणि नियतकालिकांच्या माध्यमातून पटवून दिले. तत्कालीन महाराष्ट्राचा भौगोलिक आवाका व्यापक असतानासुद्धा आणि प्रचार आणि प्रसाराची कुठलीही साधने फारशी हाताशी नसताना महात्मा फुले यांनी 'सत्सार'सारख्या व कृष्णराव भालेकर आणि मुकुंदराव पाटलांच्या 'दीनबंधू' या नियतकालिकामधून त्यांचे विचार खेड्यापाड्यांत पोहोचविले. दीनमित्र, कैवारी, अंबालहरी, राष्ट्रवीर, विजयी मराठा, प्रबोधन पत्रिका

यांसारख्या अनेक महत्त्वाच्या नियतकालिकांमधून महात्मा फुले व त्यांच्या अनुयायांनी सत्यशोधक समाजाविषयीचे आपले विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवले. म्हणूनच असे म्हणता येते की, आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत, समाजाच्या जडणघडणीत सत्यशोधक समाजाची भूमिका ही अतिशय महत्त्वपूर्ण असून त्यातून प्रकटणारे महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांच्या सत्यशोधक विचारवंतांचे, नेत्यांचे विचार आणि कार्य समाजाला आगळी वेगळी कलाटणी देणारे आहेत. म्हणूनच मानवी जीवनाच्या विविधांगांना स्पर्श करून त्यांचा विकास घडवून आणण्याचे फार मोठे सामर्थ्य या सत्यशोधक समाजाच्या विचारांमध्ये आहे. या समाजाची विचार प्रक्रिया, आचारपद्धती, तत्त्वनिष्ठा, जडणघडण व प्रबोधन एक विशिष्ट ध्येयाने प्रेरित झाले असल्याने महाराष्ट्राचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय नेतृत्त्व घडविण्याची ताकद त्यातून दिसून येते.

समाज धर्मसत्तेखाली व अर्थसत्तेखाली भरडला जात असताना शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित, स्त्रिया, कष्टकरी जनता त्यांच्या समस्या प्रचलित पद्धती आणि प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व या समाजाचे आधुनिक दृष्टीने परिवर्तन करण्यासाठी महात्मा फुल्यांनी स्थापन केलेली ही चळवळ आहे. महाराष्ट्राच्या बाहेरही काही राज्यांमध्ये या सत्यशोधक समाजाने प्रबोधनाचे कार्य केलेले आहे. अशा या सत्यशोधक समाज चळवळीतील दृश्य–अदृश्य आणि जाणत्या–अजाणत्या अशा नेत्यांचा, त्यांच्या कार्यांचा व त्यांच्या विचारांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करणे सदरील विषय निवडण्यामागील हेतू आहे.

सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली स्पष्ट होती. सामाजिक विषमता, अंधश्रद्धा आणि गुलामगिरी नाहीशी करणे शेतकरी व बहुजनांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी त्यांना आधुनिक लोकशाहीचा मार्ग दाखविणे, शैक्षणिक सुधारणा त्यांच्यापर्यंत पोहोचवून समाजक्रांती करणे असे बहुआयामी कार्य करणे हे या समाजाचे ध्येय होते असे जाणवते. त्यावर विविधांगांनी प्रकाश पडावा व त्याचे राजकीय दृष्टिकोनातून मूल्यमापन व्हावे असे या संशोधनाचे सर्वसाधारण स्वरुप आहे.

या संशोधनासाठी प्रकाशित, अप्रकाशित साधन सामुग्रीद्वारे व विविध विचार प्रवाहाचा सत्यशोधक समाजाच्या कार्यावर पडलेला प्रभाव, राजकीय जडणघडण त्यातून निर्माण झालेले नेतृत्व आणि तत्त्वप्रणाली यामुळे झालेली सामाजिक जडणघडण याचा विचार संस्थात्मक स्वरूपात आजपर्यंत फारसा झालेला नाही. तो करण्यासाठी या चळवळीच्या साधन सामुग्रीच्या आधारे प्रकाश टाकण्याचा, संस्थात्मक, संघटनात्मक दृष्टीने शोध घेण्याचा व अभ्यासण्याचा संशोधकाचा हा प्रयत्न आहे. तशा प्रकारचे प्रकाशित,

अप्रकाशित, संग्रहित व स्वत: शोधून काढलेली विशेष स्वरूपाची सामुग्री व मुलाखत अनुसूचिंच्या सहाय्याने, वृत्तपत्रीय कात्रणे इत्यादी साधन सामुग्रीचा अभ्यास व आधार घेऊन हा अभ्यास सुकर झाला आहे. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाज संघटनेच्या चळवळीचा आत्मा हा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्य आणि समता प्रस्थापित करणे हा होता. या उलट इतर चळवळी या एकांगी होत्या. उदा. डॉ. मंगुडकर म्हणतात त्याप्रमाणे, ''महाराष्ट्राचा गेल्या हजार वर्षांचा इतिहास हा आपल्या मानवी समतेच्या, स्वातंत्र्याच्या झगड्याचा इतिहास आहे. अकरा–बाराव्या शतकांत येथे उत्तर महाराष्ट्रात, मध्य महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या दक्षिणेस कर्नाटकमध्ये अनुक्रमे महानुभाव पंथ, भागवत संप्रदाय व लिंगायत पंथ यांच्या चळवळी सुरू झाल्या. या तिन्ही चळवळींमागील मूळ प्रेरणा मानवी समतेची, धार्मिक स्वातंत्र्याची होती. या चळवळी सुरू होण्यापूर्वी अनेक शतके येथे धार्मिक स्वातंत्र्य उच्चवर्णीयांपुरते मर्यादित होते. मुक्तीचा मार्ग बहुसंख्य समाजाला नाकारला गेला होता. मानवाचे धार्मिक स्वातंत्र्य, समता समाजाच्या अल्पशा थरात कोंडली गेली होती. अशा काळात धार्मिक समतेचा, स्वातंत्र्याचा सर्वांना समान अधिकार आहे, असे वरील चळवळींच्या प्रवक्त्यांनी घोषित केले. अर्थात् वरील तिन्ही चळवळींमध्ये धार्मिक समतेची प्रेरणा असली तरी तिच्यामध्ये सामाजिक समतेचा आशय नव्हता. किंबहुना सामाजिक जीवनातील जातिव्यवस्थेवरच त्यांचा विश्वास होता.''[१]

जातिव्यवस्थेचा तात्त्विक पाया कर्मविपाकाचा सिद्धान्त व पुनर्जन्माचा विचार हा होता. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थरचना हा तिचा बळकट आधार होता. मध्ययुगामध्ये जातिव्यवस्थेच्या वैचारिक वा आर्थिक पायावर आघात करणे कठीण होते. परंतु मध्ययुगीन जीवनाच्या पार्श्वभूमीवर वरील तिन्ही चळवळींनी धार्मिक विषमतेमध्ये अडकलेल्या मानवी समतेला अध्यात्मिक क्षेत्रात का होईना, मुक्त करण्याचा प्रयत्न केला ही उल्लेखनीय घटना आहे.

वरील संतांनी धार्मिक समतेचे आपले कार्य जेथे संपविले, तेथे अव्वल इंग्रजीमध्ये महात्मा फुले यांनी सामाजिक समतेच्या चळवळीचे कार्य सुरू केले. महात्मा फुले यांनी अस्पृश्यतेवर आघात केले. स्पृश्य समाजातील जातीय विषमतेवर प्रहार केले. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला. म. फुले यांनी सुरू केलेल्या या सामाजिक समतेच्या चळवळीचे कार्य पुढे ग्रामीण भागात कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चालविले. म. फुले यांच्याप्रमाणे समकालीन कालखंडात लोकहितवादींनी हे कार्य नागरी भागात सुरू केले. त्यांच्याच कार्याचा धागा पकडून सामाजिक समतेचे कार्य अधिक प्रगत करण्याचा प्रयत्न न्या. रानडे, प्राचार्य गो. ग.

आगरकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी केले. महाराष्ट्रात सामाजिक समतेसाठी झगडा चालू असताना पुढे लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली राजकीय स्वातंत्र्यासाठी तीव्र संघर्ष येथे सुरू झाला. १९२० नंतर म. गांधींच्या नेतृत्वाखाली याच चळवळीला अधिक व्यापक स्वरूप आले.

भारतीय राजकीय स्वातंत्र्याच्या झगड्याचे कार्य देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर मर्यादित अर्थाने संपले. त्यानंतर आता आर्थिक समतेसाठी देशामध्ये संघर्ष सुरू झाला आहे. भारताच्या दहा पंचवार्षिक योजना, भारतीय राज्यघटना यामागील महत्त्वाचे उद्दिष्ट आर्थिक समता वा स्वातंत्र्य आहे. या दृष्टीने पाहता आमच्या हजार वर्षांच्या इतिहासामागील मूळ प्रेरणा मानवी समतेची वा स्वातंत्र्याची आहे. भारताच्या या विविध चळवळी म्हणजे भारताच्या या स्वातंत्र्याच्या आकांक्षेची मनोहर रूपे आहेत. या भारताच्या मानवी स्वातंत्र्याच्या संघर्षामध्ये म. फुले यांना महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक समतेच्या संघर्षाचे प्रवर्तक म्हणून त्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.

## व्यापक चळवळीचा एक भाग :

भागवतपंथीय संतांपेक्षा म. फुले यांच्या समतेचा आशय वेगळा होता. भागवत पंथातील संतांना धार्मिक समता हवी होती, परंतु जातिव्यवस्थेवर, सामाजिक विषमतेवर त्यांचा विश्वास होता. म. फुले यांनी धार्मिक समतेबरोबर सामाजिक समतेचाही पुरस्कार केला. एक अर्थाने १९ व्या शतकात सर्व हिंदुस्थानभर वेगवेगळ्या भागांत सुरू झालेल्या एका व्यापक प्रेरणेचा एक भाग म्हणजेच म. फुले यांची चळवळ होय. १८२७ च्या सुमारास बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मो समाज स्थापन झाला होता. १८६७ मध्ये मुंबई येथे न्या. रानडे यांच्या प्रेरणेने प्रार्थना समाज सुरू झाला होता. १८७३ मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांच्या नेतृत्वाखाली पंजाबमध्ये आर्य समाजाची स्थापना झाली होती. बंगाल, महाराष्ट्र, पंजाब येथे सुरु झालेल्या चळवळींमागील प्रेरणा सामाजिक समतेची होती. पाश्चात्य शिक्षण, मिशनरी लोकांच्या चळवळींमागील प्रेरणा यांच्यामुळे हिंदुस्थानात निरनिराळ्या भागांतून समाजसुधारकांमध्ये आत्मपरीक्षणाची निकोप प्रवृत्ती निर्माण झाली होती. आमच्या दोन–अडीच हजार वर्षांच्या परंपरागत सामाजिक, धार्मिक जीवनाची पुनर्रचना करण्याचा विचार सुरू झाला होता.

म. फुले यांनी महाराष्ट्रामध्ये १८७३ मध्ये सुरू केलेले सत्यशोधक समाजाचे कार्य म्हणजे भारतभर निर्माण झालेल्या व्यापक समाज–सुधारणांच्या प्रेरणेचा एक भाग होता. वरील चळवळीच्या आविष्कारामध्ये फरक होता. म. फुले यांच्या कार्याचा अविष्कार मुख्यत: ग्रामीण भागातील उपेक्षित समाजाच्या संदर्भात

झाला, आणि त्यांना प्रामुख्याने सामाजिक समतेबरोबर आर्थिक आणि राजकीय समता प्रस्थापित व्हावी यासाठी त्यांना अट्टहास होता.

### व्यक्ती व समाजसंस्था यामध्ये फरक हवा :

म. फुले हे मुख्यत: मानवी समतेचे पुरस्कर्ते ! या मानवी समतेच्या आड येथील जातिव्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रियांची सामाजिक गुलामगिरी आली, म्हणून त्यांनी या समाजव्यवस्थेवर टीका केली. असे असूनही त्यांच्याबाबतीत महाराष्ट्रात अपसमज आहेत. याचे प्रमुख कारण त्यांच्या जीवनकार्याच्या व विचाराच्या चुकीच्या मूल्यमापन पद्धतीमध्ये आहे असे वाटते. म. फुले यांनी मुख्यत: जी टीका केली ती प्रामुख्याने 'भटशाही', 'पुरोहितसंस्था वा ब्राह्मण' यावर केली, परंतु दुर्दैवाने भटशाही व भट, पुरोहित संस्था व पुरोहित, ब्राह्मण्य व ब्राह्मण यातील फरक येथे पुरेसा स्पष्ट झाला नाही. त्यातून अनेक अपसमज जन्माला आले.

''मार्क्सने युरोपमध्ये ज्याप्रमाणे भांडवलशाहीवर टीका केली. भांडवलदार व्यक्तीवर नव्हे किंवा म. गांधींनी इंग्रजांच्या साम्राज्यशाहीवर टीका केली, इंग्रज व्यक्तीवर नव्हे. त्याप्रमाणे म. फुले यांनी भटशाहीवर टीका केली, भट या व्यक्तीवर नव्हे, परंतु दुर्दैवाने दोन्हींमधील फरक पुरेसा स्पष्ट न झाल्यामुळे अनेक अपसमज निर्माण झाले. याला त्यांचे टीकाकार कारणीभूत आहेत, त्याप्रमाणे म. फुले यांच्या विचारांची अभिव्यक्ती अंशत: जबाबदार आहे. परंतु अभिव्यक्तीपेक्षा आशय महत्त्वाचा असल्याने आपण आशयावर आपले लक्ष केंद्रित करणे जरूर असते.''[२] त्याचप्रमाणे प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्त्व दिले पाहिजे. म. फुले दाम्पत्यांचे संपूर्ण जीवनच कृतीशील होते. ते केवळ बोलणारे सुधारक नव्हते. तर प्रत्यक्ष कृतीवर त्यांचा भर होता.

महात्मा जोतिराव फुले यांनी समाज परिवर्तनाचे क्रांतिकारी कार्य शिक्षणापासून सुरू केले आणि त्याला संस्थात्मक स्वरूप सत्यशोधक समाजाची स्थापना करून पूर्ण केले. त्यातून प्रेरणाच प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात आणि देशभर समाज परिवर्तनाचे कार्य सुरू झाले. ''सत्यशोधक चळवळ हीच भारतातील खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचलेली पहिली चळवळ होती हेही सत्य इतिहासाला नमूद करावे लागेल. ही चळवळ म्हणजे खेडुतांना शिक्षण नि ज्ञान देऊन त्यांच्या ठायी वसत असलेली अज्ञानाची नि पूर्वग्रहांची जळमटे झटकून टाकून आधुनिक संस्कृतीचे आणि ज्ञानाचे कोण त्यांच्यापर्यंत पोहोचविणारी एक सामाजिक प्रबोधिनी होती. जोतिरावांच्या काळी सत्यशोधक चळवळीला ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप आले नव्हते. जोतिरावांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केला नाही. शासनसंस्था, आर्थिक व्यवहाराची साधने, सामाजिक

आणि धार्मिक सत्ता ही सर्व ब्राह्मणांच्या हाती असल्यामुळे त्या चळवळीचे स्वरूप वरवर पाहता ब्राह्मणेतरी आहे. ब्राह्मणेतर चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.''[3] या चळवळीचा अभ्यास आज अनेक दृष्टीनी महत्त्वाचा आहे. कारण ही कृतिशीलतेवर आधारलेली चळवळ होती.

## १.२ संशोधन विषयाची निश्चिती :

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सत्यशोधक समाजाची विचारधारा ही रुढी परंपरेला छेद देऊन आधुनिकतेची कास धरणारी असल्याने प्रस्थापित रुढी, चळवळींच्या इतिहासात सत्यशोधक समाजाची चळवळ ही एक गतिशिल, परिवर्तनवादी, सामाजिक चळवळ म्हणून पुढे आलेली आहे.

महात्मा फुल्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी आपल्या सहकाऱ्यांसमवेत सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील आपल्या काही सहकाऱ्यांसोबत सत्यशोधक समाजाची स्थापना करून जोमाने कार्य सुरु केले. धर्म सत्तेखाली व अर्थ सत्तेखाली भरडला जाणारा समाज शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित वर्ग, स्त्रिया व सर्वच कष्टकरी जनता या समाज चळवळीचा मूळ गाभा होता. सत्यशोधक समाजाच्या या चळवळीने बहुजन समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक परिवर्तनासाठी अपूर्व लढा दिला. सत्यशोधक चळवळ ही खेड्यापाड्यांपर्यंत पोहचलेली आधुनिक भारतातील पहिली समाजप्रबोधनाची चळवळ होती. हजारो वर्षांपासून ग्रामसंस्कृतीत दबलेल्या, पिचलेल्या, शोषित समाजंच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठीची ही चळवळ होती. महात्मा फुले म्हणजे सत्यशोधक समाज असे एक साधे सोपे समीकरण त्याकाळी मांडले जात होते आणि त्यामुळेच सत्यशोधक चळवळीच्या उभारणीत अन्य काही कार्यकर्त्यांचा सहभाग हा अतिशय महत्वाचा राहिला.

सत्यशोधक समाज हा एकखांबी तंबू नव्हता. ती एक चळवळ होती. महाराष्ट्राच्या बाहेरही चालविलेले एक जनआंदोलन होते. या जनआंदोलनाचे नेतृत्व जसे तत्कालीन नेत्यांनी केले तसे समाजाच्या कार्यकर्त्यांनी चालविलेल्या नियतकालिकांनी या लढ्याचे वैचारिक नेतृत्व केले. यामध्ये प्रामुख्याने कृष्णराव, भालेकर, नारायण, मेघाजी लोखंडे, वासुदेवराव बिर्जे व तानुबाई बिर्जे, गणपतराव पाटील, भास्करराव जाधव यांनी अत्यंत प्रभावीपणे विविध अशा नियतकालिकांच्या माध्यमातून सत्यशोधक चळवळीच्या प्रचार आणि प्रसाराचे कार्य केले. याचाही वेध घेण्यासाठी या विषयाची निवड केली. सत्यशोधक चळवळीतील अशा जाणत्या अजाण त्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनाच्या

माध्यमातून घेण्याचा मानस असून त्यातून एका तत्त्वनिष्ठ विचार प्रवाहाची लाट निश्चितच दिसून येईल अशी आशा वाटते.

सत्यशोधक समाजाची ही चळवळ समाज सुधारणांच्या कार्यासोबत चळवळीतील नेते, कार्यकर्ते, लेखक, पत्रकार यांनी विविध प्रकारचे साहित्य समाज जागृतीसाठी लिहिले. जसे, कथा, कांदबऱ्या, कविता, नाट्यरूप वाङ्मय अशा ललित वाङ्मयामधून त्यांचे साहित्य प्रकाशित झाले असून, त्यामुळे बहुजन समाजात अभूतपूर्व अशी जनजागृती झाली. विचार जागृत होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व मानवता सहिष्णुता आदी नवमूल्यांची अभिव्यक्ती झाली. आधुनिक विचारसरणीचा अवलंब केला गेला. अस्सल समाजिक जाणीवा निर्माण झाल्या. ग्रामीण खेड्यापाड्यांतून शिक्षणापासून दूर असणारा समाज हळूहळू जागृत होऊन या विचार प्रवाहात येऊ लागला. एक बदलता समाज हळूहळू निर्माण होऊ लागला. या विचाराने भारावलेल्या विचारवंतांकडून व त्यांच्या साहित्यामधून, त्यांच्या नियतकालिकांमधून प्रबोधनपर आशय व आधुनिक मूल्यांची अभिव्यक्ती करणारे सत्यशोधक चळवळीला पोषक असे वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय निर्माण होऊ लागले. अशामध्ये मराठी समाज व मराठी साहित्यांच्या जीवनविषयक जाणीवांच्या कक्षा रुंदावण्याचे व स्पष्ट वैचारिक, बुध्दिवादी भूमिका घेऊन समाजाला उन्नत व प्रगत विचार देण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले. म्हणून त्यांची तत्त्वनिष्ठा, विचारधारा ही समस्त समाजाला बोध देणारी आहे. यामध्ये दुसऱ्या पिढीत प्रामुख्याने मौलिक भर घालणारे साधारणत: १९१० नंतर मुकुंदराव पाटील, अण्णासाहेब लठ्ठे, वालचंद कोठारी, भगवंतराव पालेकर, श्रीपतराव शिंदे, केशव सीताराम ठाकरे, श्यामराव देसाई, खंडेराव बागल, बाबासाहेब बोले, दिनकरराव जवळकर, बाबूराव यादव, व्यंकटराव गोडे, रामचंद्र लाड, बळवंतराव पिसाळ, द. भि. रणदिवे आदी विचारवंतांनी सत्यशोधक समाजाला चळवळीला विचार देऊन कार्याचा प्रचार–प्रसार करून या सर्व संपादक सत्यशोधक कार्यकर्त्यांनी सामाजिक जडणघडणीत मोलाची भर घातली. ती कशी? अशा आजपर्यंत उपेक्षित राहिलेल्या या विचारधारेचा अभ्यास एका वेगळ्या अंगाने व्हावा म्हणून हा विषय निवडला आहे. सत्यशोधक समाजाच्या चळवळींच्या माध्यमातून झालेल्या समाजिक जडणघडणीत सत्यशोधकांच्या विचार प्रवाहाची धारा कशी उपयोगी पडली.

‘सत्यशोधक समाज : तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव’ (Satya Shodhak Samaj Ideology, Leadership and Political Impact) या संशोधन विषयाची निश्चिती करण्यात आली. कारण आधुनिक महाराष्ट्र घडविण्यासाठी ज्या काही प्रमुख संस्था–संघटना आणि महनीय व्यक्तींचे योगदान लाभले त्यात महात्मा फुले यांनी स्थापन केलेली ‘सत्यशोधक समाज’ ही संघटना होय.

अशा या संघटनेची विचारसरणी, ध्येयधोरणे, कार्यपद्धती, साधणे आणि या संघटनेला मिळालेले नेतृत्व याचा अभ्यास करुन या संघटनेचे, चळवळीचे संपूर्ण समाजावर, सर्व क्षेत्रांवर झालेले परिणाम अथवा प्रभाव याचा संशोधनात्मक पद्धतीने आढावा घेणे, त्याच्या निष्कर्षाप्रत जाणे हे होय.

## १.३ संशोधन विषयाचे महत्त्व :

आधुनिक महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रांतील विकासासाठी आणि तत्पूर्वीच्या भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीसोबत सामाजिक प्रबोधनाच्या आणि विकासाचा प्रारंभच एकोणिसाव्या शतकातील म. ज्योतिराव फुले यांनी सुरु केलेल्या कार्यातून आणि त्यांच्यासारख्या इतरही समाजसुधारकांच्या कार्याचा आणि चळवळीचा परिणाम म्हणजेच आजचे प्रगतिशील जीवन होय.

महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आजपर्यंत काही संशोधन झालेली आहेत. परंतु 'सत्यशोधक समाज' या संघटनेबद्दल या संघटनेच्या विचारप्रणालीबद्दल आणि तिच्या चळवळीबद्दल, या संघटनेतील नेते व त्यांच्या कार्याबद्दल आणि या संघटनेच्या, कार्याचा महाराष्ट्रातील राजकारणावर आणि तेथील राजकीय पक्षबांधणीवर झालेला परिणाम यावर मात्र व्यापक व सर्वांगीण संशोधन झालेले नव्हते. परंतु आजही या विषयात, त्यातील उपविषयात अधिक सखोल चिंतन आणि संशोधन होण्याची गरज आहे. कारण सत्यशोधक समाज या संघटनेची स्थापन झाल्यापासून ते आजपर्यंत सर्वच बाबतीत चांगले परिणाम झालेले आहेत आणि वर्तमान व भविष्यातही होतील. तद्वतच प्रत्येक संशोधकाचा एक स्वतंत्र दृष्टिकोन असतो. म्हणूनही असे संशोधन करण्याची आवश्यकता संशोधकाला वाटली.

म. ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले त्यांचे संपूर्ण जीवनकार्य आणि त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज तसेच या संघटनेला, चळवळीला अधिक व्यापक करणारे थोर सत्यशोधक नेते या सर्वांमुळेच आजचा आधुनिक महाराष्ट्र आणि भारत देश घडविण्यास मदत झालेली आहे. म्हणून या विषयावर अधिकाधिक संशोधन झाले पाहिजे. वेगवेगळ्या कालखंडांतील सत्यशोधक समाजाची चळवळ त्यातील चढउतार याचे वेळोवेळी विश्लेषण अथवा मूल्यमापन झाले पाहिजे. कारण, त्यातूनच पुढील प्रगतीचा मार्ग सापडू शकतो. म्हणून या संशोधनाचे महत्त्व नेहमीसाठीच राहणार आहे. सामाजिक शास्त्रातील कोणतेही संशोधन कधीच परिपूर्ण नसते आणि ते शेवटचेही नसते. म्हणून अशा संशोधनाचे कार्य वेळोवेळी होत राहिले पाहिजे हे जसे सत्य आहे म्हणून हा सत्यशोधक सत्यशोधनाचा एक प्रयत्न महत्त्वाचा आहे, या प्रयत्नामध्ये पुढील प्रमुख बाबी आहेत.

१. सत्यशोधक चळवळीच्या संस्थात्मक कार्याचे संशोधन होईल. कारण या चळवळीतील काही महनिय व्यक्तिंवर यापूर्वी काही अपूर्ण स्वरुपाचे संशोधन झालेले आहे. मात्र संघटनेवर संशोधन झालेले नाही.

२. महाराष्ट्राच्या प्रबोधन परिवर्तनवादी चळवळीचा आढावा घेता येईल.

३. समाजपरिवर्तनवादी चळवळीचे महाराष्ट्रातील सर्वप्रकारच्या क्षेत्रावर जे विविध प्रकारचे परिणाम होतात त्यात प्रामुख्याने राजकीय, सामाजिक क्षेत्रावर कोणते परिणाम झाले याचा शोध घेणे. या संघटनेच्या विचारप्रणालीवर आधारीत काही राजकीय पक्षांची बांधणी झाली काय? याचे विश्लेषण करणे.

४. 'सत्यशोधक समाज' या संघटनेमधील प्रारंभीपासून ते आजपर्यंतच्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेणे.

५. वर्तमान व भविष्यातील पुरोगामी चळवळीपुढील आव्हानांचा शोध घेण्यासाठी म. फुलेच्या चळवळीतून प्रेरणांचा शोध घेणे, मार्गदर्शन घेणे.

६. सत्यशोधक चळवळीच्या कार्याचे मुल्यमापन करणे.

७. सत्यशोधक चळवळीची संघटनेची संक्षेपाने माहिती एकत्रित करणे.

८. सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करताना म. फुले प्रणित आणि त्यानंतरच्या चळवळीचा आढावा घेणे.

९. आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालित आणि विकासात सत्यशोधक चळवळीच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करणे.

१०. सत्यशोधक चळवळीच्या समकालिन इतर चळवळीचा आढावा घेतांना सत्यशोधक चळवळ इतर चळवळीपेक्षा पुरोगामी, विज्ञाननिष्ठ आहे याचा शोध घेणे इत्यादी दृष्टिकोनातून या संशोधन प्रकल्पाच्या अभ्यासाचे महत्त्व सांगता येईल.

## १.४ संशोधन विषयाची पद्धती :

भौतिकशास्त्रे आणि सामाजिकशास्त्रे यातील संशोधन पद्धती, निष्कर्ष आदी बाबी भिन्न असतात. परंतु सामाजिक शास्त्रातील संशोधन मानवाच्या सांस्कृतिक विकासासाठी महत्त्वाचे असते. ''इंग्रजी भाषेतील 'Research' या शब्दासाठी मराठीत 'संशोधन' हा शब्द वापरला जातो. Research चा भाषिक अर्थ असे व्यक्त करतो की एखादी वस्तू हरवलेली आहे, तिचा शोध घेतला, पण ती सापडली नाही. म्हणून तिचा पुन्हा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यात जो भाव आहे त्यात वस्तू ज्ञात आहे, ती आपल्या जवळ होती पण अनावधानाने किंवा चुकून हरविली आहे आणि तिला पुन्हा प्राप्त करावे या हेतूने पुन: पुन्हा तिचा शोध घेतला जात आहे. म्हणूनच Research चा भाषिक अर्थ अपर्याप्त ठरतो. वैज्ञानिक अर्थाने पाहिल्यास येथे हरवलेल्याचा शोध नाही, तर अस्तित्वात असूनही अज्ञात आहे, अस्तित्वात आहे याचे संकेत उपलब्ध आहेत. या संकेतांचा वापर करुन जे दडलेले आहे किंवा आवरणात आहे किंवा जे अदृश्य स्वरूपात आहे त्यांना बाहेर खेचून काढणे किंवा त्यावरील आवरण बाजूला करणे किंवा अदृश्याला दृश्यमान बनविणे म्हणजे संशोधन होय. अरूपाला रूप देणे, अज्ञाताला ज्ञात जगतात ओढून आणणे म्हणजे संशोधन. इथे या प्रक्रियेत हरवल्याचा किंवा त्याच्या शोधाचा भाव नाही तर जे अज्ञात आहे त्याला ज्ञात करविण्याची जी प्रक्रिया अवलंबिली जाते तिला 'संशोधन' असे संबोधतात. ही प्रक्रिया नवीन ज्ञान निर्मितीसाठी, जुन्या ज्ञानाची पडताळणी घेण्यासाठी किंवा उपलब्ध ज्ञानाची उपयोगिता आहे किंवा नाही याचा निर्णय घेण्यासाठी वापरली जाते.

संशोधन या शब्दाचा उपयोग 'Research' या संदर्भाशिवाय अन्य संदर्भातही केला जातो. उदा. संविधानातील संशोधन किंवा संविधानातील दुरुस्ती, संशोधनाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेकदा 'शोध' या शब्दाचा वापर केला जातो.

संशोधनाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेकदा 'अन्वेषण' या शब्दाचा वापर करावा लागतो. अन्वेषणासाठी इंग्रजीत 'Invention' हा शब्द वापरण्यात येतो. अन्वेषणाचा अर्थ नव्याने झालेल्या जाणिवेला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयोगशाळेचा उपयोग करून त्याच्या सैद्धांतिक स्वरूपाला भौतिक रूपात मांडून सिद्ध करणे होय. अन्वेषणात बुद्धी, श्रम, वेळ व धन खर्च करावे लागते. यासाठी निश्चित योजनाबद्ध पद्धतीचा वापर करावा लागतो. संशोधनासाठी अनेकजण 'अनुसंधान' हा शब्द वापरतात. 'अनु + संधान' या दोन शब्दांनी मिळून बनलेल्या या शब्दाचा अर्थ 'लहान जुळवणी' असा होतो. त्याचा

व्यवहारात वापरात असलेला अर्थ 'व्यवस्थित सांधणी' हा आहे. म्हणून संशोधन या शब्दासाठी पर्यायी शब्दाचा शोध घेणे किंवा नवीन शब्द निर्माण करण्यापेक्षा Research साठी मराठीत संशोधन या शब्दाचा उपयोग करणेच पूर्णत: सयुक्तिक, योग्य व उचित ठरते.

ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्यांच्या शोधासाठी काळजीपूर्वक केलेले अन्वेषण किंवा परीक्षण हे संशोधन होय. नवीन ज्ञान प्राप्तीच्या व्यवस्थित प्रयत्नाला संशोधन असे म्हणतात. प्रत्येक युगात नवीन तथ्ये व नवीन विचार अस्तित्वात आले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीने सामाजिक जीवनात बदल घडवून आणले आहेत. यामुळेच आजचे युग हे संशोधनाचे क्रांतिकारी युग म्हणून सर्वत्र मान्यता पावले आहे. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत संशोधन होत आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या सामर्थ्यानुसार संशोधन कार्य करीत आहे. संशोधनात त्यांनी जो स्तर प्राप्त केला आहे त्या आधारावर ते राष्ट्र आणि त्याचा समाज विकसित, विकसनशील व अविकसित यापैकी एकात वर्गीकृत केला जातो.''[४]

''मानवाच्या इतिहासाइतकाच मानवाचा ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न जुना आहे. कारण ज्ञान संपादन करणे, ही मानवाची स्वभावप्रवृत्तीच असल्यामुळे प्राचीनतम कालखंडापासून तो ज्ञानप्राप्तीसाठी विविध साधनांचा वापर करून ज्ञान प्राप्त करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे. सामान्य नियमांच्या आधारे अभ्यास करून आपले वर्तमानकालीन व भविष्यकालीन जीवन सुसह्य बनविण्याचा प्रयत्न मानव सातत्याने करीत आला आहे. आधुनिक काळातील शोधामागे एक शास्त्रोक्त प्रवृत्ती आहे. नैसर्गिकशास्त्राप्रमाणेच सामाजिक शास्त्रातही शास्त्रोक्त प्रवृत्ती जोपासली जाऊन तिच्या आधारेच सामाजिक घटनांबाबत संशोधन करण्यात येऊ लागले आहे. सामाजिक संशोधनात वस्तुनिष्ठता राखणे कठीण आहे. परंतु वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून सामाजिक घटनांचे शास्त्रीयदृष्ट्या अध्ययन करून नवीन ज्ञान प्राप्त करणे शक्य होते.''[५]

शास्त्रीय पद्धतीचे स्वरूप स्पष्टपणे लक्षात घेतल्याखेरीज संशोधनाचे स्वरूप आणि आशय यांचे आकलन होणे कठीण आहे. सरळ व सोप्या शब्दांमध्ये संशोधनाचा अर्थ मांडावयाचा झाल्यास असे म्हणता येईल की, ''संशोधन हा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून बुद्धिनिष्ठ आणि व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न आहे. अनुभवकक्षेत येणाऱ्या घटनांबद्दलच्या का? कसे? व काय? या प्रकारच्या प्रश्नांची तर्कशुद्ध उत्तरे मिळण्याची शक्यता वाढावी याच उद्देशाने शास्त्रीय पद्धतीचा विकास झालेला आहे. पण याचा अर्थशास्त्र सर्वच प्रश्नांची अचूक व निश्चित उत्तरे देण्यास समर्थ आहे असा निश्चितच होत नाही. आजही बरेचसे प्रश्न अनुत्तरितच आहेत. पण याही प्रश्नांची उत्तरे शास्त्रीय पद्धतीचा

उपयोग करूनच मिळविता येण्यासारखी आहेत. वर्तमान युगाची शास्त्रावरील ही श्रद्धा कार्ल पियर्सन (Karl Pearson) यांनी उत्तम प्रकारे व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''सत्याचे आकलन होण्यासाठी जवळचा रस्ता नाही. विश्वाबाबतचे ज्ञान शास्त्रीय पद्धतीच्या गवाक्षातूनच करून घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही.''[६] तेव्हा सामाजिक शास्त्रातील संशोधन मानव समाजाच्या ऐतिहासिक, वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या म्हणजेच १९ व्या शतकातील सामाजिक आणि राजकीय चळवळींचे आणि विकासाच्या संदर्भात म. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीला अतिशय महत्त्व आहे सदर चळवळीचा अप्रकाशित व प्रकाशित भाग संशोधकीय स्वरूपातून मांडण्याचा हा प्रयत्न आहे हे संशोधन आहे.

महात्मा जोतिराव फुले यांनी स्थापन केलेली सत्यशोधक समाज ही संघटना आणि तिचे कार्य हे महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रामध्ये पुरोगामी परिवर्तन घडवून आणणारे होते. विशेषत: आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत फुले विचारांचा प्रभाव फार मोठा आहे. प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार संशोधनाने घेतला आहे. म्हणून हा संशोधन प्रकल्प हाती घेण्यात येऊन या विषयावर उपलब्ध असलेले मूलभूत ग्रंथ, प्रकाशित, अप्रकाशित साधन सामुग्री, मूलभूत दैनिके, साप्ताहिके, संग्रहित साहित्य अशा दुय्यम स्त्रोतांचा व काही प्रमुख मुलाखती, प्रश्नावली, चर्चा व विचारविनिमय इत्यादी प्राथमिक स्त्रोतांचा आधार घेऊन या संशोधन विषयाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत संशोधनामधून ''सत्यशोधक समाज–तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव'' याचा आशयाच्या अंगाने अभ्यास केला असून, सत्यशोधक चळवळ ही समाज प्रबोधनासाठी चळवळ होती. तिची विचारधारा ही समाजाला प्रेरणा देणारी होती. सत्यशोधक चळवळ, नियतकालिके त्यांची धोरणे स्वरूप, निर्मिती, प्रेरणा, आशयसूत्रे, वाङ्मयीन वैशिष्ट्ये यातून व्यक्त झालेली मूल्ये, तत्कालीन सामाजिक परिस्थिती व त्या परिस्थितीचा सत्यशोधकीय लेखकांनी लावलेला अन्वयार्थ, समकालीन मराठी वाङ्मयाची तुलना आणि या अनुषंगाने प्रस्तुत प्रबंधात 'सत्यशोधक समाज' समोर ठेवून अभ्यास केला आहे.

**'सत्यशोधक समाज तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव'** हा प्रस्तुत संशोधन विषय असल्याने महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाचे कार्य, तत्त्व, त्यातून झालेली समाजाची आणि राजकारणाची जडण–घडण, निर्माण झालेले नेतृत्व व त्याचा समाजावर पडलेला प्रभाव याचा विचार प्रस्तुत प्रबंधातून

करण्यात आला आहे. महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या विविध चळवळी त्यात प्रमुख असणारी चळवळ म्हणजे सत्यशोधकीय चळवळ होय. या चळवळीचा मूळ हेतू हा या समाजाला त्याच्या दैववादी, विषमतावादी दास्यातून मुक्त करणे हा आहे. हा समाज मुक्त करण्यासाठी एका कणखर व परखड नेतृत्वाची गरज असते. ती गरज महात्मा फुल्यांच्या रूपात मुकुंदराव पाटील, दिनकरराव जवळकर, नारायण मेघाजी लोखंडे, भगवंतराव पाळेकर, श्यामराव देसाई, श्रीपतराव शिंदे, के. सी. ठाकरे, खंडेराव बागल या प्रमुख नेते, विचारवंतांनी व त्या नंतरच्या परंपरेने कशी भरून काढली त्यांचा महाराष्ट्रावर काय परिणाम झाला याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये केला आहे.

''आधुनिक काळात महात्मा जोतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या परंपरेविरुद्ध घोषित युध्द पुकारले आणि या परंपेला ज्ञात इतिहासात पहिल्यांदाच मोडून पाडण्याइतके हादरे दिले. पण अजूनही हे घोषीत युध्द, पुरोहित संस्थेच्या व धर्माने सुरक्षित ठेवलेल्या हितसंबंधांविरुद्ध संपूर्ण वंचित समाज अशा व्यापक स्वरूपाचे युद्ध झाले नाही. महात्मा फुले यांच्यानंतर वैचारिक पातळीवर या घोषित संघर्षाला व्यापक संघर्षाचे स्वरुप येऊ शकले नाही. आर्य आणि अनार्य, वैदिक आणि अवैदिक, अध्यात्मवादी आणि जडवादी, अभौतिकवादी आणि भौतिकवादी, आर्य संस्कृती आणि लोकायतन संस्कृती असे द्वंद्वात्मक नाते असणाऱ्या या वैचारिक परंपरा प्राचीन काळापासून समाज जीवनात अखंडपणे अस्तित्वात आहेत. परंतु या वैचारिकतेचे सातत्य टिकविता आले नाही. या वैचारिक परंपरेशी विरोधात्मक नाते जोडले ते महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी या वरील परंपरांचा अभ्यास आणि त्यांच्या नेतृत्वाने भारावलेला समाज या विषयीचा सखोल अभ्यास हा एक चिंतनाचा विषय असल्याने सामाजिक दृष्टिकोनातून तो संशोधनासाठी मांडावयाचा प्रयत्न केला आहे. तो खालील पध्दतीने मांडला आहे.

## अवलंबिलेली किंवा अंगीकारलेली शास्त्रीय पध्दती :

**''सत्यशोधक समाज–तत्वप्रणाली नेतृत्त्व आणि राजकीय प्रभाव''** या संशोधनामध्ये सत्यशोधक समाजाने सामाजिक जडण–घडणीत महत्त्वाची भूमिका बजावली. ही भूमिका बजावत असताना महात्मा फुल्यांपासून ते आतापर्यंत होत आलेल्या सत्यशोधकीय चळवळींचा निवडक आराखडा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सत्यशोधकीय कार्यकर्त्यांमधील निर्माण झालेली विचारधारा ही समाजाला कशी प्रेरणा देणारी आहे याचाही विचार समजाशास्त्रीय दृष्टिकोनातून करणे आवश्यक असल्याने

त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणतीही चळवळ ही समाज परिवर्तनाची महत्त्वाची चळवळ असते. त्यात सामाजिक अंध:श्रध्दा निर्मूलनाची बीजे पेरली जात असतात. तेच सत्यशोधक परंपरेने केलेले आहे. त्याचा विचार व्हायला हवा. तोही या संशोधनाच्या निमित्ताने अपेक्षित आहे. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे सत्यशोधक नियतकालिकांनी सामाजिक जडण–घडणीत मोठा हातभार लावल्याचे दिसते. मग दीनबंधू हे सत्यशोधक चळवळीचे पहिले नियतकालिक सुरू झाले तेव्हाच्या पर्वाचा प्रारंभ सत्यशोधक चळवळीची १८७३ ते १९३० या कालखंडात निघालेली नियतकालिके त्यात प्रमुख म्हणजे हंटर, ब्राह्मणेतर कैवारी, प्रबोधन, नवयुग व सत्यवादी छोटी पत्रे काही काळ चालून पुढे बंद झाली. यामधील प्रामुख्याने विजयी मराठा, जागृत्ती, दीनमित्र, राष्ट्रवीर व सत्यवादी आदी काही चालली काही बंद पडली. त्यात राष्ट्रवीर व सत्यवादी अजूनही सुरू असून समाजाला दिशा देण्याचे काम करत आहेत.

सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचे एक राजकीय अंग असलेल्या ब्राह्मणेतर पक्षांचे १९३० मध्ये काँग्रेसमध्ये विलीनीकरण झाले. व चळवळीची विचारधारा काहींशी क्षीण झाली कालांतराने या चळवळीची स्वतंत्र अशी विचारधारा न राहिल्याने त्याचा परिणाम समाजावर होऊ लागला. तत्त्व आणि नेतृत्व या दोन गोष्टी या चवळीच्या अनुषंगाने कमी जास्त होत गेल्याने बरेचसे बदल जाणवू लागले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही तत्त्वे प्रामुख्याने समाजाला प्रेरणा देणारी ठरली. याचा स्थूल अभ्यास सदरील संशोधनाच्या अनुषंगाने करावयाचा असून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हा विषय मांडावयाचा आहे. सामाजिक नीतिमूल्यांच्या दृष्टीने राजकीय प्रवाहात ही चळवळ कशी आली याचाही विचार करणे या ठिकाणी अभिप्रेत आहे.

## सामाजिक-सांस्कृतिक पध्दती :

सत्यशोधक समाजाची विचार प्रणाली ही समाजाला आगळी वेगळी प्रेरणा देणारी असल्याने सामाजिक जडण–घडणीत या समाजाचा मौलिक असा वाटा आहे. कारण महात्मा फुल्यांनी मोठ्या दूर दृष्टीने या समाजाची स्थापना करून ही चळवळ मोठी केली. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, परिवर्तन घडून आल्याशिवाय माणूस शहाणा होत नाही. माणूस शहाणा झाल्याशिवाय सामाजिक सुधारणा होऊ शकत नाहीत. हे महात्मा फुल्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न, मागासलेल्या जातीजमातींचे दु:ख आणि प्रश्न, सामाजिक ऐक्य स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला. समाजामध्ये एका विचार परंपरेतली वैचारिक अधिष्ठान असलेली विचारधारा निर्माण केली. तत्कालीन सामाजिक प्रश्न सुवर्ण मुक्तांवरती होणारा अन्याय आणि कुणबी समजल्या

जाणाऱ्या शेतकरी समाजाचे प्रश्न किती गंभीर आहेत या जाणीवेतून सामाजिक–सांस्कृतिक पध्दतीने ते कशा प्रकाराने सोडविले जातील याचा विचार केला म्हणूनच हा प्रस्तुत विषय सामाजिक, सांस्कृतिक पध्दतीने संशोधनासाठी निवडलेला आहे.

### राजकीय पध्दती :

सत्यशोधक समाज हा एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेला असून या समाजाचा दृष्टिकोन सर्वसमावेशक आहे. समाजातील अठरापगड जाती धर्मातील माणसे या समाजाने एकत्र केली. ब्राह्मणवाद्यांविरोधी भूमिका मांडली म्हणूनच बहुजनांच्या जीवनाचा वेध देणारा हा समाज होय. महात्मा फुल्यांनी ब्राह्मणाचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असूडसारख्या ग्रंथसंपदेतून समाजाला जागे करण्यासाठी ब्राह्मण्य जोपासणाऱ्या ब्राह्मण समाजावर मोठ्या जोमाने ताशेरे ओढले. समाजात बोकाळलेला ब्राह्मण विकृतीचा वसाहतवाद व शोषण याविरूध्द आवाज उठविला. त्या दृष्टिकोनातून तशी राजकीय विचारधारा निर्माण झाली. मुकुंदराव पाटलांनी कुलकर्णी लीलामृत दृढदाशास्त्री परात्रे सारख्या कांदबऱ्यांमधून स्वातंत्र्यपूर्व काळातील मुख्य प्रवाहातले इतर कादंबरीकार बोटावर मोजण्याइतपत आहेत. ज्या ब्राह्मण्याच्या प्रादुर्भावाविरूध्द महात्मा फुले व इतर सत्यशोधकांनी कठोर संघर्ष केला ते ब्राह्मण्य तर आजही आहे. नव्या ब्राह्मण्याचे रंग, रूप आणि वेशभूषा बदलली असली तरी मूळ गाभा तसाच आहे. वर्ण वर्चस्वाचा नवा ब्राह्मण्यवाद आला आहे. आपल्या देशात येऊन राज्य करून शोषण करणारा सत्यशोधकांच्या कार्यकाळातील इंग्रजांचा वसाहतवाद गेला असला तरी त्यांच्या देशातच राहून आमच्या देशाची धुरा आमच्यातल्याच पुढाऱ्यांच्या हाती देऊन तरीसुध्दा आमच्या देशाचे म्हणजेच आमच्या देशातील बहुजनांचे शोषण करणारा वर्ग शोषण व्यवस्था राजकीय शक्ती वरचढ बनत आहेत. याचा वेध घेण्यासाठी हा संशोधन विषय एक संशोधनाचा भाग म्हणून निवडला. या समाजाने स्वीकारलेली राजकीय मूल्ये कशी आहेत याचाही आलेख यामधून यावा ही अपेक्षा आहे.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे :

१. महात्मा फुले आणि त्यांनी स्थापन केलेली सत्यशोधक समाजाची चळवळ याचा ऐतिहासिक आढावा घेणे.

२. सत्यशोधक समाजाच्या चळवळीने प्रभावित झालेल्या इतर चळवळी आणि व्यक्ती यांच्या कार्यांचा आढावा घेणे.

३. सत्यशोधक समाज एक संघटना म्हणून तिच्या कार्यांचे मूल्यमापन करणे.

४. आधुनिक महाराष्ट्राच्या जडण–घडणीत महात्मा फुले आणि त्यांचा सत्यशोधक समाज या त्यांच्या संघटनेचे कार्य, प्रभाव आणि परिणाम याचे वस्तुनिष्ठ संशोधन करून त्याचे महत्त्व विशद करणे.

५. वर्तमान व भावी पिढीला या द्वारे मार्गदर्शन–प्रेरणा देण्यासाठी उपयोगी पडणे.

## १.६ संशोधनाची गृहीतके (Hypothesical Research) :

**सत्यशोधक समाज :** 'तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव' या संशोधन विषयाच्या अनुषंगाने काही प्रमुख गृहीतके संशोधकाने पुढीलप्रमाणे दिली आहेत.

१. म. गौतम बुद्ध, थॉमस पेन, राजा राममोहन रॉय, संत तुकाराम यासारख्यांच्या विचारांतून सत्यशोधक चळवळीला आधार प्राप्त झाला.

२. सत्यशोधकीय विचार हे स्वातंत्र्य, सामाजिक समता, न्याय प्रस्थापित करणारी असल्याने वर्तमान कालखंडातही मूलगामी ठरतात.

३. सत्यशोधकीय समाजाची चळवळ राजकीय पाठबळाअभावी भारतात विस्तारू शकली नाही.

४. विविध राजकीय पक्ष, संघटना, व्यक्ती या सत्यशोधकीय विचार पूर्णत: स्वीकारल्याचा देखावा करतात आणि सोयीची तितकेच तत्त्वे स्वीकारतात. कारण यामागे त्यांचा वैयक्तिक स्वार्थ दडलेला असतो

५. महात्मा फुलेंबरोबरच सावित्रीबाई फुले यांचा प्रभाव सत्यशोधक चळवळीवर मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते.

६. सत्यशोधक चळवळीचा प्रभाव प्रारंभीपासूनच समाजातील विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रांवर पडलेला होता आणि आज व उद्याही हा प्रभाव राहणार आहे. कारण सत्यशोधक समाजाची तत्त्वे ही मानवमुक्ती आणि प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वरील गृहीतके निश्चित केलेली आहेत.

## १.७ संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र :

संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र महात्मा जोतिबा फुले आणि त्यांनी स्थापन केलेला ‘सत्यशोधक समाज’ असून या संघटनेचे ध्येय, या समाजातील नेते व त्यांचे कार्य व त्यांच्या कार्यांचा प्रभाव, महाराष्ट्राच्या जनमानसावर झालेला परिणाम आदींचा अभ्यास करणे. अशा प्रकारे या संशोधनाच्या अभ्यासाची व्याप्ती व क्षेत्र ठरविलेले आहे. या संशोधनासाठी १९ वे शतक अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण या शतकातच महाराष्ट्रातील प्रमुख सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाच्या चळवळींचा प्रारंभ आणि विकास झाला. त्याचेच परिणाम पुढील शतकावर झाले. त्याचा अभ्यास हा या संशोधनाचा विषय आहे.

## १.८ साहित्य सर्वेक्षण : पूर्व संशोधन अभ्यासाचा आढावा -

भारतातील स्वातंत्र्य चळवळ, सामाजिक परिवर्तनाची चळवळ आणि तिचे महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक चळवळीवर आणि विकासावर परिणाम होणे स्वाभाविक होते. पण या चळवळीचा सखोल असा अभ्यास आणखीनही करण्यास वाव आहे.

राष्ट्रीय चळवळीच्या चौकटीत आणि त्या चौकटीबाहेरसुद्धा समाजसुधारणांचा आणि समाज पुनर्रचनेचा विचार महाराष्ट्रात फोफावला. विष्णुबुवा ब्रह्मचारी, दादोबा पांडुरंग, म. जोतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, महादेव गोविंद रानडे, आगरकर, टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, चिपळूणकर, शि.प. परांजपे, महर्षी धोंडो केशव कर्वे तसेच शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सारख्या थोर विचारवंतांनी या समाजचिंतन आणि प्रबोधनाच्या प्रक्रियेस गती दिली. एवढेच नाही तर मोठमोठ्या सामाजिक आणि राजकीय चळवळींना देखील त्यांनी प्रेरणा दिली. पण सामाजिक चळवळ, समाज प्रबोधन आणि समाज परिवर्तन यांचा जो अन्योन्य संबंध आहे त्याची फारशी गंभीरपणे दखल समाजशास्त्रज्ञांनी, विशेषत: महाराष्ट्रातील समाजशास्त्रज्ञांनी घेतली नाही असे खेदाने म्हणावे लागते. तात्पर्य महाराष्ट्रात एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकारंभी झालेले समाजचिंतन आणि प्रबोधन हे आपल्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची समाजशास्त्रज्ञांनी फारशी दखल घेतली नाही हे विधान करीत असताना कुणावर आपण अन्याय तर करीत नाही ना याची खबरदारी घेतली पाहिजे. सामाजिक आणि राजकीय चळवळीचे समाजशास्त्र असे एक विशेष अध्ययन क्षेत्र म्हणून गेल्या एक-दीड दशकांत मान्यता पावले गेले. असे असले तरीही जवळपास बेचाळीस वर्षांपूर्वी मुंबई विद्यापीठातच प्रा. अक्षयकुमार देसाई

यांनी भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी (Social Background of Indian Nationalism) हा अप्रतिम आणि बहुचर्चित ग्रंथ लिहिला. पण त्यांच्या संशोधनाचा रोख हा व्यापक राष्ट्रीय चळवळीवर असल्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक अवधीनंतर डॉ. गेल् ओमवेट यांनी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळींचा समाजशास्त्रीय अभ्यास करून "Cultural Revolt in a Colonial Society" हा ग्रंथ प्रसिद्ध केला. स्वत: महाराष्ट्रीयन नसूनसुद्धा केवळ संशोधनासाठी मराठी भाषा शिकून, जोतिबा फुले, केशवराव जेधे , जवळकर, मोरे आदींचे लेखन आणि अस्सल कागदपत्रांची पाहणी करून ब्राह्मणेतर चळवळीच्या सामाजिक पार्श्वभूमीचा ऐतिहासिक मागोवा गेल् ओमवेट यांनी घेतला आहे. त्यांचा उपक्रम केवळ स्तुत्यच नाही तर अनुकरणीयही आहे. त्यांच्या विश्लेषण पद्धती, संकल्पना आणि काही निष्कर्षांबाबत मतभेद असू शकतील. पण म्हणून त्यांच्या प्रयत्नाचे महत्त्व नाकारता येणार नाही.

केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर एकंदरच भारतीय समाजशास्त्रात ''सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र'' हे क्षेत्र दुर्लक्षित राहिले किंवा अविकसित राहिले आहे. जवळजवळ १९७० पर्यंत या विषयाची फारशी दखल घेतली नाही. ज्यांनी थोडी फार घेतली त्यांना समाजशास्त्रांतील प्रस्थापितांकडून फारशी मान्यता मिळाली नाही. १९६५ पर्यंत म्हणजे जवळ जवळ ४५ वर्षे होता, यात संरचनात्मक प्रकार्यवाद (Structural Functionalism) या सैद्धांतिक दृष्टिकोनाचा समाजशास्त्रावर सगळ्यात जास्त प्रभाव होता. कमी अधिक प्रमाणात तो आजही आहे, पण त्याच्या जोडीने समाज ही एक व्यवस्था (System) आहे. या संकल्पनेचाही अलीकडे फार प्रादुर्भाव झाला आहे त्यात गैर काहीच नाही. परंतु समजाकडे ती एक संरचना (Structure) किंवा 'सामाजिक व्यवस्था' (Social System) आहे. असे पाहत असताना कळत नकळत काही गृहीत तत्त्वांशी बांधीलकी निर्माण झाली. त्यातून 'स्थैर्य' (Stablility) हाच संरचनेचा गाभा असतो. हे तर आम्ही मानू लागलोच, पण त्या बरोबरच स्थैर्य हे व्यवस्थेचे अंतिम उद्दिष्टही असले पाहिजे असा एक आदर्शवाद उराशी बाळगू लागलो. त्यामुळे कुठल्याही समाजरचनेचा परिवर्तनशीलता हा स्थायिभाव असतो. बदल सतत घडणे आणि घडत राहणे हे समाजाचे खरे चिरंतत्त्व आहे. याचा विसर पडत गेला. कोणत्याही समाजाचे अध्ययन हे त्याचा ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेतल्याखेरीज पूर्ण होऊ शकत नाही. कारण समाजाची जी आज दिसणारी जडणघडण आहे ती परिवर्तनाच्या अनेक अवस्था क्रमश: पार करून तयार झालेली असते.

''सामाजिक चळवळी आणि त्यांचा महाराष्ट्रातील समाजरचनेवर व समाजाच्या पुनर्घटनेच्या प्रक्रियेवर काय परिणाम झाला याचा समाजशास्त्रीय अभ्यास न होण्यामागे इतिहासाकडेच मुळी दुर्लक्ष हे एक प्रमुख कारण होते असे मी मानतो. समाजशास्त्राचा संबंध सद्यस्थितीतला समाज, सामाजिक संस्था, सामाजिक संबंध कसा आहे. त्याला इतिहासाशी, गतकाळाशी काय घेणे देणे? अशी चुकीची धारणा पसरली. तिला संरचनात्मक प्रकार्यवादाच्या भारतीय आवृत्तीने तात्त्विक अधिष्ठान दिले.''[७]

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव महाराष्ट्राच्या बाहेर इतर विविध प्रांतांमध्ये सुद्धा झालेला दिसून येतो. डॉ. काशीनाथ कावळेकर यांनी 'Non Brahmin Movement In Southern India 1873-1949' या आपल्या संशोधनात दक्षिण भारतातील सत्यशोधक चळवळीच्या प्रभावातूनच 'मद्रासमध्ये जस्टिस पार्टी' स्थापन झाली होती आणि त्यातूनच तामिळनाडूमध्ये डी. के. व डी. एम. के. या पक्षाचे राजकारण निर्माण झाले. अशा प्रकारचे अतिशय महत्त्वपूर्ण विवेचन त्यांनी आपल्या संशोधनात केलेले आहे. पण या संशोधनाला अधिक व्यापक प्रसिद्धी मिळालेली नाही.

सत्यशोधक चळवळीतील अतिशय मान्यवर अशा नेत्यांच्या जीवनकार्यावर पीएच्.डी.साठी आणि एम.फिल.साठी महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठांतही अतिशय महत्त्वपूर्ण असे संशोधन अनेक अभ्यासकांनी केलेले आहे. १९९५ मध्ये डॉ. पी. एन. शिंदे यांनी 'लाईफ ॲण्ड करियर भाई माधवराव बागल' यांच्यावर पीएच्.डी.साठी संशोधन झालेले आहे. तर १९९२ मध्ये 'लाईफ ॲण्ड वर्क ऑफ शरदराव जाधव' यांच्यावर सी. बी. बाबर यांनी संशोधन केले. १९९८ मध्ये 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक, राजकीय विचार' या विषयावर प्रा. जाधव अजितानंद यशवंत यांनी संशोधन केलेले आहे. 'महात्मा फुले आणि महाराष्ट्रातील राजकारण' या विषयावर प्रशांत कदम यांनी संशोधन केलेले आहे. श्री. संभाजी खराट यांनी सत्यशोधक चळवळीतील 'जलसे' या अतिशय महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन केलेले आहे. एम.फिल.साठीची काही संशोधने पुढीलप्रमाणे झालेली आहे. सत्यशोधक केशवराव विचारे जीवन आणि कार्य 'प्रा. उज्ज्वल जाधव, विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदे' या विषयावर श्री. मोरे संभाजी आनंदा यांनी संशोधन केलेले आहे. तर 'भाई माधवराव बागल' या थोर सत्यशोधक नेत्यावर प्रा. अशोक खंडागळे यांनी संशोधन केलेले आहे. श्री. पाटील अ. रा. यांनी ज्येष्ठ शे.का.प. नेते भाई उद्धवराव पाटील तर सुनील कुलकर्णी यांनी सत्यशोधक रा. ना. चव्हाण यांचे सामाजिक व राजकीय विचार या विषयावर संशोधन केलेले आहे. डॉ. ज. रा. शिंदे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन कार्यावरील केलेले संशोधन अतिशय मूलगामी स्वरूपाचे आहे. एकूणच सत्यशोधक चळवळीतील विविध नेत्यांच्या जीवन-विचार

कार्यावर अतिशय मौलिक असे संशोधन झालेले आहे. पण तरीही आणखीन अधिक सूक्ष्म रीतीने मोठ्या प्रमाणात संशोधन होण्याची गरज आहे.

'सत्यशोधक चळवळींच्या नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास' (१८७७ ते १९३०) या अतिशय महत्त्वपूर्ण विषयावर प्रा. अरुण शिंदे यांनी अतिशय मौलिक असे संशोधन केलेले आहे. 'महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्ग, जाती प्रमुख' या विषयावर डॉ. उमेश बागडे यांनी संशोधन केलेले आहे. सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या पत्रकारितेच्या संदर्भातील विषयावर प्रा. अशोक एरंडे यांचे संशोधन अतिशय महत्त्वपूर्ण आहे. सत्यशोधक शंकरराव मोरे यांच्या जीवनकार्यासंदर्भात प्रा. एस. एस. गाठाळ यांचेही संशोधन मौलिक असे आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचा इतिहास या महत्त्वपूर्ण विषयावर प्रा. दिनेश मोरे यांचे संशोधन ही महत्त्वाचे आहे. श्री. धायगुडे यांनी 'सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ' या विषयावर संशोधन केलेले आहे.

अशा प्रकारे सत्यशोधक चळवळीतील नेते आणि सत्यशोधक चळवळीच्या अनुषंगाने विविध अभ्यासकांनी अतिशय मौलिक असे संशोधन केलेले आहे. यातील फारच कमी संशोधन पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध झालेले आहे. फार मोठ्या प्रमाणात संशोधन कार्य अप्रकाशित स्वरूपात त्या–त्या विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये अभ्यासकांच्या वाचनासाठी उपलब्ध होऊ शकते. सत्यशोधक चळवळीचा आणि त्यातील नेत्यांचे गेल्या शंभर–सव्वाशे वर्षांतील कार्य आणि त्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या राजकारणावर आणि समाजकारणावर पर्यायाने सर्वच क्षेत्रांवर झालेला आहे.

## १.९ संकल्पना :

**''सत्यशोधक समाज : तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव''** : (Satya Shodhak Samaj : Ideology, Leadership and Political Impact) या संशोधन विषयातील शब्दांचे / संकल्पनांचे अर्थ समजून घेणे हे ही महत्त्वाचे आहे. वरील संशोधन विषयात चार शब्द महत्त्वाचे आहेत.

१. सत्यशोधक समाज (Satya Shodhak Samaj)

२. तत्त्वप्रणाली / विचारसरणी (Ideology)

३. नेतृत्व आणि (Leadership)

४. राजकीय प्रभाव (Political Impact)

## १. सत्यशोधक समाज :

म. ज्योतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी आपल्या समविचारी मित्रांच्या सहकार्याने ''सत्यशोधक समाज'' या संघटनेची स्थापना केली. सत्याचा शोध घेणारा, आधुनिक, विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी विचारांचा प्रसार कृतीतून करणारी एखादी संघटना असावी, म्हणून ''पुण्यात ज्योतिरावांकडे त्यांची मित्रमंडळी जमली व परमविचारांनी, धर्म, कर्म, व्यवहार यात शूद्र नाडले जाऊ नयेत म्हणून ''सत्यशोधक समाजाची'' स्थापना त्यांनी जाहीरपणे केली. त्यांच्या अगोदर इ.स. १८६४ मध्ये मुंबईला व इ.स. १८७० मध्ये पुण्याला ''प्रार्थना समाज'' सुशिक्षितांनी स्थापन केला होता. साधारणत: त्याच धर्तीवर पण शूद्रांच्या खास उद्धारार्थ सत्यशोधक समाजाची स्वावलंबनाने स्वतंत्र संघटना स्थापन करण्यात आली. हा समान स्थापन झाल्यावर सभासदांसाठी प्रमुख नियम सम्मत करण्यात आले व घटना केली गेली.[८]

''मूळ सत्यशोधक समाज निर्मिक एक, धर्म एक, मनुष्य जात मानणारा म्हणून स्थापन झाला. सर्वच धर्मांच्या धर्मग्रंथातून सर्वांशी प्रमाण मानण्याजोगा भाग नसल्याने सत्यशोधक समाज ग्रथांचे सर्वप्रामाण्य मानीत नाही. अवतारवाद, विभूतिपूजा व मूर्तिपूजा त्याला मान्य नाही. नामस्मरणाचा भक्तिमार्ग त्याला पसंत नाही. भागवतधर्म व त्याचे शुद्ध स्वरुप पत्करणाऱ्या प्रार्थना समाजाप्रमाणे तो परमार्थवादी राहिला नाही. परलोक व ईश्वराची साक्षात भेटही त्याला मंजूर नाही. त्याचे स्वरूप जास्तीत जास्त इहवादी–सामाजिक आहे. स्त्री–पुरुष, मुलगा–मुलगी यात पक्षपात करू नये; एवढेच नव्हे तर पुरुषापेक्षा स्त्री श्रेष्ठ, असे ज्योतिरावांनी प्रतिपादन केले. सर्वांना सारखा समधर्म व कायदा आणि नीती असावी, मनुष्येतर जिवांना माणसाएवढी बुद्धी नाही. मनुष्याने या प्राप्तबुद्धीच्या आधारे सद्‌असद्‌विवेक करून सदाचाराने वागावे. स्वर्ग व दैववाद खरा नाही. आकाशातील ग्रहांची पीडा होते हे खरे नाही. धर्म व राज्यभेद मनुष्यात नसावेत, असा मानवतावाद ज्योतिरावांनी सर्व मनुष्य जातीच्या हितास्तव मांडला. त्यांना वेगळा धर्म किंवा आणखी एक नवा संप्रदाय, पंथ स्थापन करायचा नव्हता. त्यांचा रोख धर्मग्रंथांतील विषमतेवर व पक्षपातावर होता. म्हणून सत्य काय आहे व असत्य ते कोणते हे शोधण्यासाठी 'सत्यशोधक' हे व्यापक नाव पत्करले. भोळाभाव नाहीसा करून विज्ञानात्मक दृष्टिकोन स्वीकारावा हे ध्येय होते.[९]

सत्यशोधक समाज संघटनेच्या स्थापनेसंदर्भात आणि संस्थेच्या नावासंदर्भात वरील विवेचनावरून 'सत्यशोधक समाज' या शब्दाचा अर्थ, आशय समजून येईल. म. ज्योतिरावांना अभिप्रेत असलेल्या संघटनेच्या संकल्पनेचा अर्थ वरीलप्रमाणे आहे.

## २. तत्त्वप्रणाली / विचारसरणी :

सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली अथवा विचारप्रणाली म. ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि सत्यशोधक समाजातील फुल्यांचे समकालीन आणि त्यानंतरच्या काळातील सत्यशोधकीय नेते आणि विचारवंत यांनी वेळोवेळी मांडलेली आहे. परंतु 'विचारप्रणाली अथवा तत्त्वप्रणाली याचाही अर्थ समजावून घेतला पाहिजे त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

''आस्था आणि विश्वास यावर आधारलेल्या वैचारिक बैठकीला Ideology किंवा विचारधारा म्हणता येईल किंवा त्याला विश्वास, विकृती, विचारांचा उगम शोधण्याची वृत्ती, सत्य ज्ञानाचा शोध अशा विचारांचे मंथनही म्हणता येईल. विचारधारेचा वैज्ञानिक आधार शोधणे कठीण आहे. त्यामागील दृढविश्वास, सत्याचा शोध घेण्याची पद्धत, मतभेद, खंडनमंडन याआधारे विचाराधारा पाहता येईल.[१०]

''विचारप्रणाली ही एक मूल्यव्यवस्था असते. विचारप्रणाली म्हणजे राजकीय व्यवस्था, त्या व्यवस्थेची ध्येये आणि उद्दिष्टे व ती प्रत्यक्षात कशा पद्धतीने अमलात आणता येतील यासंबंधीचा एक वैचारिक आराखडा असतो. ही विचारप्रणाली मांडताना त्यात व्यक्त करण्यात आलेली मूल्यव्यवस्था साकार करण्यासाठी भूतकालीन संदर्भ, वर्तमानकालीन स्पष्टीकरणे आणि भविष्यासंबंधीचे चित्र रंगविण्याचा प्रयत्न केला जातो. विचारप्रणालीत व्यक्त केलेल्या भूमिकेनुसार तिचे समर्थन करणारे अनुयायी तिला लाभतात. विचारप्रणालीद्वारे तर्कसंगत मांडणी करण्यात येऊन एका विशिष्ट व्यवस्थेची रचना स्पष्ट केलेली असते. या वैचारिक व्यवस्थेद्वारे वास्तवता आणि तात्त्विकता या दोन्ही बाबींमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला असतो. विचारप्रणालीद्वारा अनेक प्रश्नांची उत्तरे आणि स्पष्टीकरणे दिली जातात. ही विचारसरणी लोकांना कार्यप्रवण करण्याचे काम करते तेव्हा तिचे रूपांतर चळवळीत होते. समाजवाद, मार्क्सवाद, उदारमतवाद, गांधीवाद ही या विचारसरणीची काही उदाहरणे आहेत. या विचारसरणीवर आधारित ग्रंथ, जाहीरनामे, घोषवाक्य प्रसिद्ध करून तिला जनमान्यता मिळविण्याचे प्रयत्न तिचे समर्थक करतात. त्याचबरोबर बदलत्या परिस्थितीनुरूप विचारसरणीत भर घातली जाते. नवीन कार्यक्रम जोडले जातात. नवीन अन्वयार्थ शोधले जातात. मात्र विचारप्रणालीत मूलभूत बदल होत नाहीत. नवसमाजवाद, नवमार्क्सवाद इ. पुढे येतात. मार्क्सदेखील तिचे महत्त्व मान्य करतो. इटालियन विचारवंत ग्रामसी तर विचारप्रणालीद्वाराच परिवर्तन घडून येऊ शकते अशी भूमिका मांडतो. त्याची Hegemong ची संकल्पना यासाठी महत्त्वाची आहे.[११]

तत्त्वप्रणाली अथवा विचारसरणी या संकल्पनेबद्दल पुढील शब्दांतही विवेचन करता येईल.

''एखाद्या समाजाच्या किंवा समाजातील गटांच्या घटकांमध्ये समान असलेली खरी किंवा खोटी मतप्रणाली या समाजात किंवा गटात सामील असण्यासाठी या मतप्रणालीला घट्ट चिकटून राहणे आवश्यक असते. अशा मतप्रणाली निरनिराळ्या प्रकारे दर्शविल्या जातात/जाऊ शकतात. लोकांच्या एका गटाच्या मतांचा/कल्पनांचा एक संच, सामाजिक सत्याविषयीच्या भ्रामक कल्पना (False Cosciouness) असमानता वा विसंगती ही वैशिष्ट्ये असलेल्या सामाजिक नात्यांच्या निर्मितीला कारणीभूत होणाऱ्या प्रथा, या सर्वांचा त्यात अंतर्भाव असू शकतो.''[१२]

समाजविज्ञान कोश (हिंदी) मध्ये विचारधारा किंवा सिद्धांतवाद यासंदर्भात पुढीलप्रमाणे विवेचन केलेले आहे. ''सांस्कृतिक मानवविज्ञान के अंतर्गत, वह सांस्कृतिक उपप्रणाली (Cultural Subsystem) जिसमे किसी सांस्कृतिक समूह के सर्वमान्य मूल्य और विश्वास आ जाता है।

राजनीतिक समाजविज्ञान के अंतर्गत, उन युक्तिओं, मान्यताओं और विचारों का समुच्चय जिनके आधारपर किसी स्थापित व्यवस्था का औचित्य सिद्ध किया जाता है। विशेषत: प्रभुत्वशाली वर्ग की सत्ता को वैधता प्रदान की जाती है।

Idealism आइडियालिज्म (प्रत्ययवाद) सामाजिक परिवर्तन के अध्ययन का एक उपागम जिसमें किसी समूह के विचारों, मूल्यों और आदर्शों को परिवर्तन का मुख्य प्रेरक तत्त्व मान कर चलते हैं। अत: यह भौतिकवाद (Materialism) का विपरीत रूप प्रस्तुत करता है।[१३]

''सर्वसाधारणत: तत्त्वप्रणाली म्हणजे विचारांचा संघ होय. संज्ञा, तत्त्वे, ध्येय, सिद्धान्त, आग्रह विचार (Dogma) कार्यक्रम व राजकीय सिद्धान्त या सर्वांचा समुच्चय म्हणजे तत्त्वप्रणाली होय. असे हे विचार सामाजिक जीवन, त्यातील व्यक्ती याचे जीवन या संबंधीचे असतात. सामाजिक व राजकीय कार्यक्रम या दृष्टीने ध्येय व सिद्धान्त म्हणून समुचित आग्रहपूर्वक मांडण्यात येणारे विचार म्हणजे तत्त्वप्रणाली होय.

ॲथनी डॉन्स असे म्हणतात की, तत्त्वप्रणाली म्हणजे उत्तम समाजव्यवस्थेची शब्दांकित प्रतिमा (Verbal Image) होय. हे एक माध्यम होय की त्याद्वारा अशी समाजव्यवस्था निर्माण केली जाऊ शकते.

सी. जी. फ्रेडरिज याने असे म्हटले आहे की राजकीय व्यवस्थेतील बदल सुधारणा किंवा स्थिरता या दृष्टीने व्यावहारिक उपायासंबंधी रास्त व योग्य रीतीने सुसंगत स्वरूपात मांडला गेलेल्या विचारांचा संच म्हणजे तत्त्वप्रणाली होय.''[१४]

''१९ व्या शतकात सर्वप्रथम फ्रान्समध्ये प्रचलित झालेली विचारप्रणाली ही संकल्पना आज राजकीय चिंतनातील परवलीचा शब्द ठरली आहे. आज प्रत्येक राजकीय संघर्ष विचारप्रणालीच्या परिभाषेत मांडला जातो आणि प्रत्येक राज्यव्यवस्थेला विचारप्रणालींवर आधारित वर्गीकरणात कुठे ना कुठे बसवले जाते. विचारप्रणाली या संज्ञेचा अर्थ इष्ट संदर्भात जसा केला जातो तसाच तो अनिष्ट संकल्पना याही संदर्भात करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे.

''विचारप्रणाली हे विचारांचे एक शास्त्र आहे'' म्हणजे विचारांचा जन्म भौतिक प्रक्रियांमधून कसा होतो हे अनुभवसिद्ध पद्धतीद्वारे शोधणे एवढेच प्रयोजन असते अशी ट्रॅसीची (Tracy) कल्पना होती. पण ही मर्यादित व्याख्या आज फारशी मान्य होत नाही. एकमेकांशी तार्किक असलेले सिद्धान्त, आदर्श राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे संकल्पन व समर्थन आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी उपयुक्त ठरणारी व्यूहरचना सांगणारी मूल्यव्यवस्था या सर्व गोष्टींचा आज विचारप्रणाली या संकल्पनेत अंतर्भाव होतो. राजकीय ध्येय, हेतू व उद्दिष्टे यात प्रतिबिंबित झालेले असतात. मॅकआयव्हर विचारप्रणालीची व्याख्या अशी करतो, ''उद्दिष्टांना जन्म देणाऱ्या राजकीय, आर्थिक व सामाजिक मूल्यांची आणि विचारांची पद्धती म्हणजे राजकीय व सामाजिक विचारप्रणाली होय. ही उद्दिष्टे राजकीय कार्यक्रमाचा केंद्रबिंदू असतात.

डॅनियल इंगरसोलच्या मते, ''प्रत्येक विचारप्रणालीमध्ये वर्तमानस्थितीचे मूल्यमापन आणि भवितव्याबाबतची दूरदृष्टी यांचा समावेश असतो.'' अधिक चांगले भवितव्य साकार करण्यासाठी एक निश्चित कार्य-योजना विचारप्रणाली पुरवीत असते. कार्ल फ्रेडरिकच्या शब्दांत ''एखादी राजकीय व्यवस्था कशी बदलायची, सुधारायची (किंवा टिकवायची) याच्या व्यावहारिक साधनांशी संबंधित बरीचशी सुसंगत विचारसंहिता म्हणजे विचारप्रणाली होय.

डेव्हिड ईस्टन याने पुढील शब्दांत विचारप्रणालीची सविस्तर व्याख्या केली आहे. तो म्हणतो, ''विचारप्रणाली म्हणजे ज्याच्या आधारे व्यवस्थेच्या सदस्यांना भूतकाळाचे निर्वचन करता येते, वर्तमानाचा अर्थ लावता येतो आणि भविष्यकाळाचा वेध घेता येतो अशा आदर्शाचा, साध्यांचा व हेतूंचा अभिव्यक्त संच असतो. राजकीय सत्ता कोणत्या हेतूंनी व कोणत्या मर्यादेत वापरावी याचे निर्धारण विचारप्रणाली करतात. त्यांना कधी राजकीय जीवनविषयक फसव्या मिथकांचे तरी कधी वस्तुनिष्ठ मूल्यांकनांचे व प्रामाणिक आकांक्षांचे स्वरूप प्राप्त असते. पण त्यांच्या ठिकाणी सुप्त सामर्थ्य असतेच, कारण कल्पनेला आकर्षित करणाऱ्या नैतिकतापूर्ण आदर्शांच्या स्वरुपात त्या अभिव्यक्त झालेल्या असतात.''[१५]

विचारसरणी ही एक विचार व्यवस्था असते (System of Ideas) प्रत्येक विचारसरणी ही विश्वाचे स्वरूप, तिची रचना, त्याला असलेला तार्किक आधार त्यात होणारे बदल व त्याची व्यावहारिकता इत्यादीचे विश्लेषण करीत असते. प्राचीन काळापासून अशा पद्धतीच्या विचाराची मांडणी वेगवेगळ्या संस्कृतीत वेगवेगळ्या विद्वानांनी केलेली आढळते; भारतात चार्वाक, गौतम बुद्ध, भगवान महावीर यांनी मांडणी केलेली आहे. ग्रीसमध्ये सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी विश्लेषणात्मक पद्धतीने विविध विषयांचा समावेश असलेला विचार दिला. चीनमध्ये कॅन्फ्युशियसेन याच पद्धतीने मांडणी केली आहे. अर्थात या मांडणीला त्या काळात व नंतरही विचारसरणीऐवजी पंथ वा धर्म म्हणून संबोधिले गेले. कौटिल्यानेदेखील याच पद्धतीची मांडणी केलेली आढळते.

परंतु 'विचारसरणी' संबोधन प्रथम फ्रेंच विचारवंत व तत्त्ववेत्ता डीस्स्ट डी ट्रेसी याने ideologie म्हणून केले. त्यालाच Seiexcr of Ideas किंवा Knowledge of Ideas म्हटले. त्यात नंतर बरीच सुधारणा होऊन १९ व्या शतकात अनेक विचारसरणींची मांडणी झाली म्हणूनच १९ व्या शतकाला 'विचारसरणीचे युग' म्हणून ओळखले जाऊ लागले. कारण औद्योगिक क्रांतीनंतर झालेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बदलांच्या प्रभावाचे व परिणामांचे विश्लेषण वेगवेगळ्या पद्धतीने करण्याची आवश्यकता होती. या वेगवेगळ्या विचारसरणीत सैद्धांतिक मांडणीबरोबर कृती कार्यक्रमही मांडला जाऊ लागला. त्यात मानवी अनुभव आणि बाह्य विश्वासंबंधीचे विश्लेषण, कार्यक्रम आणि संघटनात्मक बांधणी, त्यासाठी वापरावयाचे तंत्र आणि करावयाचा संघर्ष, विचारसरणीवर निष्ठा राखणारे भक्तगण आणि नेतृत्व इत्यादीचा समावेश केला जाऊ लागला व त्याला विचारसरणीचे स्वरूप प्राप्त होऊ लागले.

याची सुरुवात हॉब्ज, लॉक आणि रुसोच्या करार सिद्धांतापासून होते. नंतर हेगेल, मार्क्स, मॅक्स वेबर, मेन्हेमसारख्या अनेक विचारवंतांनी वेगवेगळ्या पद्धतीने विचारसरणींची मांडणी केली. विचारसरणीतील अतिरेकी भूमिका, हिंसात्मकतेला दिलेले प्राधान्य, दुसऱ्या विचारांचे अस्तित्व अमान्य करणे यासारख्या एकाकी भूमिकेतून बहूलवादी समाजाची मांडणी होऊ लागली व विचारसरणींना विरोध होऊ लागला. काही विचारसरणींत काल्पनिकतेला प्राधान्य, तर काही विचारसरणीत वास्तवतेला प्राधान्य देणारी व अनुभवनिष्ठ मानणारी यामुळे वैचारिक प्रगती होण्याऐवजी वैचारिक संघर्षाचे रूपांतर व्यावहारिक संघर्षात होऊ लागले. विचारसरणीतील परस्परविरोधी विचारांच्या मांडणीमुळे विचार संघर्ष अपरीहार्य ठरू शकतो, विचारसरणीचेच ऐतिहासिक संदर्भ, उत्क्रांत तत्त्वांनुसार त्यातील झालेले बदल व झालेला विकास

त्यातील विविध प्रवाह आणि उपप्रवाह त्यातील सातत्य आणि बदल, त्याची उपयुक्तता सैद्धांतिक मांडणी आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती, प्रत्येक विचारसरणीचे महत्त्व, तिच्या मर्यादा आणि विचारसरणीवर होणारी टीका इत्यादींचा अभ्यास होणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीने अभ्यास होत आहे.[१६] म्हणूनच तत्त्वप्रणाली/विचारसरणी ही एक अतिशय महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. कारण यावरच विविध प्रकारच्या राज्यपद्धती निर्माण होतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक चळवळी निर्माण होतात आणि त्यातूनच समाज परिवर्तन अथवा समाजाच्या विकासाची प्रक्रिया विकसित होते. म्हणून तत्त्वप्रणालीला/विचारप्रणालीला असाधारण महत्त्व आहे.

## ३. राजकीय नेतृत्व :

नेतृत्व ही संकल्पना प्रामुख्याने राजकीय, सामाजिक अथवा प्रशासनीक दृष्टिकोनातून वापरली जाते. ''समाजाच्या विकासाबरोबरच नेतृत्वाचा विकास झाला कारण नेतृत्व हे समाजाचेच एक विशेष अंग आहे. समाजाच्या अंतर्गत नेतृत्व एक स्वाभाविक रचना असल्यामुळे समाजाचे स्वरूप जस-जसे बदलत गेले तसे नेतृत्वातही परिवर्तन झाले. समाजाच्या निर्मितीपासून समाज समूहात्मक स्वरूपाचा होता. आदिम समाजातील हे समूह सामान्यत: लिंग, वय, विवाह, स्थान व आप्तसंबंध या प्रमुख बाबींवर अधिष्ठित झालेले होते. हे समूह अपत्यांचे संगोपन, मालमत्तेचे रक्षण, सलोख्याचे संबंध, शत्रूपासून संरक्षण, रोगराईचे निवारण, उदरनिर्वाहाच्या साधनांची निर्मिती, धार्मिकश्रद्धांमध्ये मेळ व्यापन करणे इ. कामे करीत होते. यातूनच नेतृत्वाचा विकास झाला.''[१७]

नेतृत्वाचे विविध प्रकार सांगता येतील, जसे - कार्यात्मक नेतृत्व आणि संख्यात्मक नेतृत्व अनौपचारिक नेतृत्व, औपचारिक नेतृत्व, राजकीय आणि अराजकीय नेतृत्व, एकूण नेतृत्व हे विविध क्षेत्रांतील असू शकते. या संशोधन कार्यात राजकीय आणि सामाजिक नेतृत्वाची संकल्पना अपेक्षित आहे आणि येथे त्याच दृष्टीने विवेचन करावयाचे आहे.

''ज्याला आपण राजकीय नेतृत्व म्हणतो त्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे, ते नेहमी शासनसंस्था आपल्या हाती यावी म्हणून प्रयत्नशील असते. त्याची वाटचाल न चुकता सत्तेच्या दिशेने होत असते. याचा अर्थ असा नव्हे की, राजकीय नेते हे केवळ सत्तालोलुप असतात. त्यांच्यापैकी काही तसे असतातही, राजकीय नेत्यांनाही समाजसुधारणेची, जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची तळमळ असू शकते. परंतु समाजकल्याणाच्या संदर्भात काही करावयाचे असेल, तर हाती राजकीय सत्ता असल्याखेरीज ते होऊच शकत नाही असा त्यांचा ठाम विश्वास असतो. सत्तास्थानी जाऊन शासनाची यंत्रणा आपल्या हाती ठेवून

आपल्याला हवे असलेले बदल घडवून आणता येतात; अन्य कोणत्या मार्गांनी जाऊन आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकत नाही, अशी त्यांची खात्री झालेली असते. याचा अर्थ राजकीय नेते सत्तेवर असताना किंवा नसताना त्यांना मान्य असलेले कार्य प्रत्यक्षपणे समाजात जाऊन करीत नाहीत असे नाही. राजकीय नेते झोपडपट्टीत कामगारांच्या वस्तीत जातील, समाजाच्या सर्व थरांमध्ये मिसळून त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेतील, विद्वानांच्या भेटी घेऊन शैक्षणिक व सांस्कृतिक समस्या जाणून घेतील आणि या सर्व क्षेत्रांतून निश्चितपणे काही तरी करावे असे त्यांना मनापासून वाटेलही. परंतु मला सत्ता मिळवून दिलीत तर मी तुम्हाला हवे ते मिळवून देईन अशी त्यांची मुख्य भूमिका असते. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नेते बहुधा राजकीय सत्तेची अभिलाषा धरीत नाहीत. परंतु राजकीय नेते मात्र त्यावर पक्के लक्ष ठेवून असतात. म्हणून केवळ एवढ्यावरुनच सामाजिक, सांस्कृतिक कार्य करणारे नेते नैतिकदृष्ट्या जास्त उंचीवर असतात आणि राजकीय नेते भ्रष्ट असतात असे निष्कर्ष काढण्याचे काही कारण नाही. राजकीय सत्तेच्या क्षेत्रात राहूनही स्वच्छ राहिलेली माणसे असू शकतात. तेव्हा आपल्या तात्त्विक चर्चेत आरंभी तरी राजकीय नेता हा सत्प्रवृत्त की दुष्प्रवृत्त, प्रामाणिक की अप्रामाणिक हा प्रश्न उद्‌भवू नये. तो सत्ताभिमुख असतो हेच त्याचे वेगळेपण.

प्राचीन काळी माणसे टोळ्या करून राहत होती. तेव्हा टोळीचे प्रमुखपद मिळविण्यासाठी शौर्य आणि संघटनाचातुर्य या दोन्ही गुणांची गरज असे. टोळ्यांची हळूहळू ग्रामे झाली. ग्रामांची राज्ये झाली आणि राज्याचे प्रमुखपद बहुधा घराण्यात वंशपरंपरा राहावे अशी प्रथा पडली. परंतु त्या काळात नेतृत्व ही मुद्दाम मिळवावी लागणारी गोष्ट नव्हती. राजाला स्वाभाविक नेता मानले जाई. त्याने नेमलेल्या प्रधानांना आणि सेनापतींना मुलकी आणि लष्करी नेते समजले जाई. सत्तास्थानी असलेला माणूस हाच नेता. त्याने कल्याण अकल्याण काहीही केले तरी इलाज नाही अशी लोकभावना जगभर शतकानुशतके रूढ होती असे दिसते. राजा अत्यंत जुलमी झाला. त्याचा अंमल सोसवेनासा झाला की, रयतेत असंतुष्टता निर्माण होई आणि हे ओळखून त्याच राजघराण्यातील दुसरा एखादा पुरुष किंवा प्रधान अगर सरदार त्या राजाला खाली ओढून आपण तख्तावर बसे. अशा तऱ्हेने नेतृत्वात म्हणजे सत्तास्थानावरच्या माणसात बदल होई. पण नवीन नेतृत्व कदाचित जनतेला अधिक सुसह्य होणारे असे आले तरी ते लोकातून येणे हा प्रकार मात्र घडत नसे.

आधुनिक जगात राजेशाही जवळजवळ नामशेष झाली आहे. जेथे ती आहे तेथे देशाच्या राज्यघटनेने नियंत्रित झालेली आहे. ज्या देशात लोकशाही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे तेथे पक्षपद्धती आहे. पक्ष जितका बळकट, शिस्तबद्ध आणि नवनव्या कार्यकर्त्यांना सभासद होण्यास

प्रवृत्त करणारा असेल तेवढे त्याच्या हाती संख्याबळ अधिक राहणार व तो पक्ष अधिकारावर राहणार हे उघड आहे.

राजकीय पक्षांच्या यशातील सिंहाचा वाटा पक्षनेतृत्वाकडे जातो. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू यासारख्या अलौकिक कर्तृत्वाच्या व्यक्तींनी आपल्या राजकीय पक्षाला देशात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. अमेरिकेत रुझवेल्ट, ब्रिटनमध्ये चर्चिल, फ्रान्समध्ये द गॉल, चीनमध्ये माओ–त्से–तुंग व व्हिएटनाममध्ये हो–चि–मिन्ह या सर्वच नेत्यांच्या भाषेला दिव्यत्वाचे असे एक वलय होते की केवळ त्यांच्यावरील श्रद्धेपोटी लक्षावधी कार्यकर्ते आपले सर्वस्व पणाला लावण्यास तयार होते. आपल्या नेत्यांच्या मार्गदर्शनाने देशापुढील सर्व प्रश्न सुटतील अशी भावना जनतेत निर्माण करून राजकीय पक्षनेत्याला आपल्या भोवती दिव्यत्वाचे असे वलय निर्माण करता यावयास हवे. त्यासाठी अर्थातच त्याच्या अंगी नेतृत्वाला व पुरुषार्थाला आवश्यक असणारे महत्त्वाचे गुण असावे लागतात. त्याचे चारित्र्य शुद्ध असले पाहिजे. तो नि:स्वार्थी असायला हवा. त्याच्या उपदेशात आणि प्रत्यक्ष कृतीत सुसंगती हवी. आपल्या पक्षाच्या तत्त्वप्रणालीवर त्याची अविचल निष्ठा असायला हवी. आपल्या देशापुढील कठीण समस्या कोणत्या हे ओळखण्याचा व त्यावर अचूक उपाय सुचविण्याचा द्रष्टेपणा त्याच्याजवळ असावयास हवा. पक्षाच्या वरिष्ठांच्या बैठकीत आपला दृष्टिकोन त्यांना पटविण्याइतके वादविवादपटुत्व त्याच्याजवळ हवे.

पक्षाची ध्येयधोरणे पोहोचविण्यात पक्ष कार्यकर्ते हा महत्त्वाचा दुवा असतो. त्यांना वरचेवर प्रत्यक्ष भेटून व त्यांच्यापुढील अडचणींची चर्चा करून पक्षनेत्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर प्रभाव कायम ठेवावा लागतो. यासाठीच त्याच्याजवळ संघटना कौशल्य हवे. आपल्या अचूक मार्गदर्शनामुळे व व्यक्तिगत गुण समुच्चयामुळे आणि कार्यकर्त्यांच्या मताची बूज राखून त्यांना आपला दृष्टिकोन पटवून देण्याच्या कौशल्यामुळे पक्षनेता आपल्या अनुयायांचे स्फूर्तिस्थान बनतो.

पक्षनेत्याला केवळ आपल्या पक्षापुरताच मर्यादित दृष्टिकोन ठेवून चालत नाही. त्याला साऱ्या देशाचा विचार करावयाचा असतो व याच दृष्टीने तो एक उत्कृष्ट लोकशिक्षक असणे आवश्यक असते. प्रभावी वक्तृत्व ही जनसामान्यांवर मोहिनी घालण्याची गुरुकिल्ली, हिटलरने जर्मन जनतेला आपल्या अमोघ वक्तृत्वानेच जिंकले होते, तर चर्चिलनेही तितक्याच प्रभावी भाषणांनी ब्रिटिश जनतेला आक्रमकांचा प्रतिकार करण्यासाठी प्रवृत्त केले होते. राजकीय पक्षनेता उत्तम लेखक असला तर आपला प्रभाव फार मोठ्या जनसमुदायावर पाडू शकतो. कारण त्याच्या लेखांचा वा पुस्तकांचा प्रसार साऱ्या देशभर किंबहुना जगभर

होऊ शकतो. आधुनिक काळात वृत्तपत्रे, रेडिओ, रेडिओवरील प्रभावी भाषणे व टेलिव्हिजनवरील मुलाखतीद्वारे राजकीय पक्षनेत्याला जनतेशी वेगाने संपर्क साधता येतो.

लोकशाही देशात संसदेत बहुसंख्य असलेल्या पक्षाचे नेतृत्व करणारा राजकीय पक्षनेता कार्यकारी मंडळाचा, मंत्रिमंडळाचा प्रमुख बनतो व त्या पदावरुनच देशाच्या प्रमुख राजकीय, आर्थिक, सामाजिक आदी सर्व प्रश्नांबद्दलचे निर्णय त्याला घ्यावयाचे असतात. त्यामुळेच या कार्यकारी नेतृत्वाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. किंबहुना असे म्हटले जाते की, आता कार्यकारी विभाग केवळ सरकारचे एक अंग राहिलेले नाही, तर साऱ्या राजकीय पद्धतीचेच ते संघटनाविषयक केंद्र बनले आहे. अनेक नवोदित राष्ट्रांमध्ये लोकशाही राज्यपद्धती अलीकडेच रूढ होत आहे. तेथे जनमानसाला आपल्याकडे वळवून राजकीय नेत्यांची मोठ्या प्रमाणात सत्ता हस्तगत केली आहे.

देशातील फुटीर प्रवृत्तीवर मात करावयाची असेल आणि एकात्मता साधावयाची असेल तर खंबीर नेतृत्वाच लागते. युद्धोत्तर काळात फ्रान्समध्ये कोणतेही मंत्रिमंडळ अधिकारावर फार काळ टिकेनासे झाले. देशाचा कारभार थंड पडल्यासारखा झाला, तेव्हा जनरल द गॉल याने देशाच्या नेतृत्वाची सूत्रे आपल्या हाती घेऊन नवी राज्यघटना तयार केली व फ्रेंच राज्यकारभारात स्थैर्य आणले.

योग्य नेतृत्व ही लोकशाहीच्या यशाची महत्त्वाची आवश्यकता आहे. कोणत्याही प्रश्नावर भावनेच्या आहारी न जाता नि:स्वार्थीपणाने निर्णय घेण्याचे कर्तृत्व नेत्याच्या अंगी असेल तरच राजकारण उच्चनैतिक पातळीवर जाऊ शकते. एकपक्षीय लोकशाहीत मात्र पक्षाच्या घटनेत आणि म्हणूनच शासनात नेतृत्वाला एवढे महत्त्व दिलेले असते की, नेता हाच साऱ्या श्रद्धांचे केंद्र बनतो आणि इतरांना फारशी किंमत राहत नाही. युद्धपूर्व काळात जर्मनात आणि इटलीत हेच झाले. कम्युनिस्ट पक्षाचीदेखील अशीच स्थिती असते.[१८] नेतृत्वासंबंधी अधिक विश्लेषण पुढील शब्दांतही मांडता येईल.

''नेतृत्व ही प्रशासनातील महत्त्वाची संकल्पना. एखाद्या गटाला किंवा संघटनेला त्या गटाच्या वा संघटनेच्या ध्येयाप्रत नेण्यासाठी दिग्दर्शकाची भूमिका म्हणजे नेतृत्व. असे नेतृत्व वेगवेगळ्या क्षेत्रांत असू शकते. सामाजिक, आर्थिक, राजकीय त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील विशिष्ट ध्येयप्राप्तीसाठी नेतृत्वाची आवश्यकता असते. त्याशिवाय कार्यकर्ते, अनुयायी कार्यप्रवण होत नाहीत. नेतृत्व करणाचा नेत्याच्या अंगी इतरांपेक्षा वेगळी क्षमता व वेगळे गुण असतात. त्याच्यावर अनुयायांचा विश्वास असतो. आपल्या गटाला किंवा संघटनेस मार्गदर्शन आणि पुढे नेण्याचे काम नेतृत्वाला करावे लागते. नेतृत्वाचे वर्तन काळ व परिस्थितीसापेक्ष असते. नेतृत्वांस जोपर्यंत अनुयायी स्वीकारतात तोपर्यंत ते टिकून राहते. नेतृत्वाचा उदय

वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पार्श्वभूमीतून होत असतो. नेतृत्व हे मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाशी संबंधित असू शकते. नेतृत्वाच्या गुणवैशिष्ट्यांवर आणि क्षमतेवर त्याचे यश–अपयश अवलंबून असते. एक नेतृत्व अपयशी ठरले की, त्याची जागा दुसरे नेतृत्व स्वीकारते व समाजाच्या सर्व क्षेत्रांत नेतृत्वबदलाची प्रक्रिया सातत्याने सुरू असते. संघटनेचा प्रमुख म्हणून मार्गदर्शक म्हणून नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची असते. नेतृत्व प्रामुख्याने नेत्यातील व्यक्तिगत गुण, त्याचे अनुयायी आणि परिस्थिती यावर अवलंबून असते. नेतृत्वाला प्रमुख भूमिका पार पाडावी लागते. त्यात निर्णय घेण्याची क्षमता, अनुयायांना दिशा दाखविण्याची जबाबदारी आवश्यक असते. त्यामुळे तो इतरांपेक्षा वेगळा असतो. तसेच तो द्रष्टा असतो.

नेतृत्व हा शब्द नेता या शब्दावरून रुढ झाला. 'नेता' हा शब्द संस्कृत धातू 'नी'पासून निर्माण झाला. 'नी' म्हणजे नेणे, पुढे नेणारा, आपल्या अनुयायांना पुढे नेणारा नेता. नेता हा आपल्या अनुयायांवर प्रभाव पाडून त्यांना प्रोत्साहन देऊन व्यवस्थापनाचे कार्य करतो. चेस्टर बर्नार्ड यांच्या मते, ''नेतृत्व म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीतील असे गुण की ज्यामुळे संघटितपणे कार्य करणाऱ्या लोकांना व त्यांच्या कार्याला मार्गदर्शन मिळते. प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी नेतृत्वाची गरज भासते. कारण प्रत्येक संघटनेची रचना करणे, देखरेख करणे व नियंत्रण ठेवणे तसेच मार्गदर्शन करणे, समन्वय साधणे अशी कार्ये करीत असतो. प्रशासकीय नेत्याची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. साधारणत: प्रशासकीय नेत्याच्या ठिकाणी सहनशक्ती, निर्णय क्षमता, इतरांची मने वळविण्याची क्षमता, जबाबदारी व बौद्धिक क्षमता हे गुण असणे आवश्यक असते. प्रशासकीय नेत्याने स्वहित बाजूला ठेवून किंवा गटाचे हित बाजूला ठेवून सार्वजनिक हिताचा विचार करणे महत्त्वाचे असते. तसेच त्याला त्याच्या कार्याविषयी निष्ठा, आत्मविश्वास असणे आवश्यक असते. प्रसंगी निर्णय घेण्याची बौद्धिक क्षमता, जो निर्णय घेतला गेला त्याबाबत स्पष्टपणा, नि:संदिग्धता असणे जसे गरजेचे असते. तसेच नेता हा उत्तम संघटक, सार्वजनिक हित जोपासणारा, नेहमी जनसंपर्कात असणारा व जनतेला जे निर्णय घेतले आहेत ते समजावून देणारा, जनतेच्या समस्यांचे निराकरण करणारा असला पाहिजे. तसेच त्याचा आदर्श अन्य सहकारी वर्ग मानणारा असल्याने त्याने आपली वर्तणूक पारदर्शी ठेवली पाहिजे.

## नेतृत्व :

सत्ताकांक्षा किंवा राष्ट्रहिताची तळमळ या दोन्ही प्रेरणा माणसाला राजकीय नेतृत्वासाठी प्रवृत्त करतात. शासनसंस्था आपल्या नियंत्रणाखाली असणे हे त्याच्यासाठी गरजेचे असते. समाजात काम

करणाऱ्यांना, त्यांच्यात मिसळणाऱ्या लोकांना, लोकोपयोगी काम करणाऱ्यांना सत्ता हवीच असते. सत्ताभिमुखता हे राजकारणाचे, समाजकारणाचे मुख्य लक्षण असते. या सत्ताकेंद्रात राजकीय नेतृत्वाचा उदय होतो. प्रभावी वक्तृत्व, जनमानसाचा वेध घेण्याची क्षमता, संघटनाकौशल्य, अनुभवी, लोकशिक्षक या गुणांनी राजकीय नेतृत्व प्रभावशाली ठरते. दूरदृष्टी, सुसंगत आचरण, समस्यांचे निराकरण करण्यासाठी निर्णयक्षमता, प्रसन्न व्यक्तिमत्त्व म्हणजे वलयांकित नेतृत्व होय.

हिटलर, चर्चिल हे प्रभावी वक्तृत्वशक्ती असलेले नेते म्हणता येतील तर लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, स्वा. सावरकर हे आपल्या पक्षाचे राजकीय महत्त्व समर्थपणे मांडणारे, स्पष्ट विचारधारा, नि:स्पृहता, स्वार्थत्याग यांनी जनमानसाला संमोहित करणारे नेते होऊन गेले. चीनमध्ये माओ–त्से–तुंग, व्हिएतनाममध्ये हो चि मिन्ह, फ्रान्समध्ये द गॉल हे असे प्रभावी राजकीय नेतृत्वाची आदर्श आहेत की ज्यांच्यावर देशाने प्रचंड विश्वास टाकला व त्यांना जणू देवत्व बहाल केले. पण सत्तालोलुपता किंवा राजकीय पदलाभाकडे पाठ फिरवून शांततेचा, अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या महात्मा गांधींना भारतीयांनी राष्ट्रपिता मानले. राजकीय नेतृत्वाचे हे दुर्मिळ उदाहरण म्हणता येईल.[१९]

नेतृत्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली आणि तिचे महत्त्वही आपल्याला स्पष्टपणे जाणवत असले तरी नेतृत्व म्हणजे काय? त्या प्रश्नाचे सोपे–सुटसुटीत व सर्वसमावेशक उत्तर थोडक्यात देणे मात्र खूपच कठीण जाते. चांगल्या नेत्याच्या अंगी ''इथॉस (Ethos), पॅथॉस (Pathos) आणि लॉगॉस (Logos) '' असे तीन गुण असणे आवश्यक असते असे ॲरिस्टॉटल म्हणाले होते. त्या संज्ञांचे मराठी पर्याय पुढीलप्रमाणे देता येतील. सामाजिक भावनिष्ठा (इथॉस), कारुण्य (पॅथॉस) आणि शब्दशक्ती (लॉगॉस). सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे नैतिक चारित्र्य सूचित होते. इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्यातून त्याला मिळते. कारुण्याच्या आधारे नेता लोकांच्या भावनांना हात घालू शकतो व उत्पत्तीनंतर जगाविषयी ईश्वराच्या मनात असलेला विचार व्यक्त करणारा शब्द असा होतो. नेत्याच्या संदर्भात शब्दशक्ती (लॉगॉस) म्हणजे स्वत:च्या कृतींचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टीकरण–समर्थन करण्याची आणि त्या आधारे लोकांना क्षमता असा अर्थ घेता येतो. जगातल्या सर्वच महान नेत्यांच्या अंगी हे तिन्ही गुण प्रकर्षाने होते असे आढळते.

''एखाद्या गटाचे विशिष्ट ध्येय आप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतूने प्रेरित झालेले वर्तन'' अशी नेतृत्वाची चपखल व्याख्या राज्यशास्त्र कोशात करण्यात आली आहे. जेव्हा हे वर्तन राजकीय स्वरुपाचे असते तेव्हा संबंधित नेतृत्वाला राजकीय नेतृत्व असे म्हटले जाते. हे वर्तन नेहमीच

परिस्थितीसापेक्ष असते. नेता, अनुयायी, गटाचे उद्दिष्ट आणि ते साध्य करण्याचे मार्ग यानुसार नेतृत्वाचे स्वरुप बदलत असते. नेतृत्वासाठी लागणारे गुण आणि वैशिष्ट्ये परिस्थितीनुरूप भिन्न असतात. नेतृत्वाशी संबंधित सर्वच बाबतीत अशी अमर्याद विविधता असली तरी एक गोष्ट मात्र वादातीत असते ती ही की नेते अनुयायी किंवा शासक–शासित हे संबंध सर्वच राजकीय घटितांच्या दृष्टीने मौलिक, महत्त्वाचे असतात. नेत्यांच्या ठिकाणी आज्ञा करण्याची राजकीय सत्ता असते आणि अनुयायांकडून त्या सत्तेला आज्ञा पालनाच्या स्वरूपात प्रतिकार मिळत असतो.

नेता–नेतृत्व करतो म्हणजे आपले सहकारी आणि/किंवा दुय्यम (सबॉर्डिनेटस्) यांना व्यक्तिगतरीत्या व सक्रियपणे सोबत घेऊन ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करतो. त्यासाठी दोन गोष्टी त्याला मुख्यत्वे कराव्या लागतात. योजनेनुसार किंवा कामाच्या आराखड्यानुसार अनुयायांचे वर्तन घडावे असे मार्गदर्शन करणे व प्रेरणा देणे आणि अनुयायांच्या भावना व कामाच्या क्रमात त्यांना जाणवणाऱ्या समस्या समजावून घेणे या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या असतात.[२०] सामाजिकशास्त्रात प्रामुख्याने राज्यशास्त्रात नेतृत्व या संकल्पनेसंबंधी विश्लेषण करण्यात येते. त्या अनुषंगाने नेतृत्वासंबंधी वरीलप्रमाणे विवेचन केलेले आहे.

## ४) राजकीय प्रभाव :

समाजसुधारक, राजकीय नेते, विचारवंत, लेखक, संशोधक आणि समाज कार्यकर्ते हे त्यांच्यावर झालेल्या विविघ प्रकारच्या प्रभावामुळे व कार्याच्या अनुभवामुळे त्यांची एक विशिष्ट विचारसरणी तयार हाते. ती विचारसरणी/कार्यपद्धती प्राचीन, परंपरावादी, व्यवस्थावादी अथवा आधुनिक, विज्ञाननिष्ठ, क्रांतिकारी, पुरोगामी आणि परिवर्तनशील अशी असू शकते. राजकीय अथवा सामाजिक अथवा सांस्कृतिक नेतृत्वावर त्या–त्या कालखंडाचे आणि परिस्थितीचे त्याच्या विचार आणि कार्यावर प्रभाव पडतात आणि या नेतृत्वाला मानणारे त्यांचे अनुयायी अथवा समर्थक हे त्यांच्या प्रभावामुळे आपापल्या क्षमतेप्रमाणे कार्य करीत असतात.

कोणत्याही समाजव्यवस्थेत राजकीय प्रभाव हा सर्वाधिक महत्त्वाचा आणि परिणामकारक असतो. कारण कुठल्याही समाजव्यवस्थेत अथवा देशात राजकीय सत्ता हीच अधिक महत्त्वाची असते आणि तिचा प्रभाव व्यक्तीच्या आणि समाजाच्या सर्व क्षेत्रांवर पडत असतो. कारण राजकीय सत्तेजवळ दंडशक्ती असते म्हणून राजकीय प्रभावाला अधिक महत्त्व असते. कारण कोणतेही निर्णय राजकीय सत्ताच घेत असते. म्हणून कुठल्याही सामाजिक, राजकीय, आर्थिक सांस्कृतिक चळवळी आणि स्थित्यंतरे ही राजकीय सत्तेच्या द्वाराच अधिक गतिमान आणि परिणामकारकरीत्या राबविण्यात येऊ शकतात म्हणून कोणत्याही

परिवर्तनवादी चळवळी, आंदोलने ही मूलभूत अशा राजकीय व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी असतात. कारण राजकीय व्यवस्थेत परिवर्तन झाले की त्याचे इतर क्षेत्रावर परिणाम होतात अथवा व्हावेत अशी अपेक्षा असते. तसेच समाजातील प्रत्येक परिवर्तनाचे अथवा बदलाचे परिणाम परस्परांवर होत असतात. कारण समाजातील सर्व घटक परस्परांशी प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या एकमेकांशी जुळलेले असतात. म्हणूनच सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील बदल राजकीय क्षेत्रावर परिणाम करतात आणि राजकीय क्षेत्रातील बदल इतर सर्व क्षेत्रांवर परिणाम करतात.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा, विकासाचा आणि परिवर्तनाचा विचार केला तर महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे कार्य स्वातंत्र्य चळवळीमध्ये आणि स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय परिवर्तनामध्ये, घटनानिर्मितीमध्ये आणि लोकशाही विकासामध्ये, राजकीय पक्षांच्या तत्त्वज्ञानात आणि कार्यपद्धतीत आणि संसदीय राज्यपद्धतीत, नवनवे कायदे करण्याच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे ठरलेले आहेत. म्हणूनच महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणावर म. फुले, न्या. रानडे, प्रा. गोखले, लो. टिळक, महर्षी वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव जेधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज अशा अनेक समाजसुधारकांच्या जीवन कार्यांचा प्रभाव इथल्या राजकीय क्षेत्रावर पडलेला आपणास दिसून येतो. राज्यकर्त्यांना राजकीय निर्णय घेताना या सामाजिक व इतर क्षेत्रातील प्रभावाचा परिणाम झाल्याचे दिसून येते. म्हणून राजकीय प्रभाव ही संकल्पना अतिशय व्यापक अशी आहे.

''राजकारणांत सत्ता आणि प्रभाव या दोन्ही कल्पना परस्पर पूरक अशा या दोन्ही संज्ञा विशिष्ट अर्थाने वापरल्या जातात. त्यांत सरमिसळ करून चालणार नाही. त्यातील बारीक भेद लक्षात न घेतल्यास वैचारिक गोंधळ निर्माण होऊ शकतो. अर्थात या कल्पना काहीशा संदिग्ध अस्पष्ट असल्यामुळे त्यातील फरक स्पष्ट करणे तेवढे सोपे नाही. राज्यशास्त्राच्या परिभाषेत किंवा व्यावहारिक बोलण्यात त्याला ठाशीव अर्थ अजून तरी प्राप्त झालेला नाही. रॉबर्ट ढालसारख्या विचारवंतानी त्यातील फरक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे या दोन्ही संज्ञा म्हणूनच समान अर्थाने वापरणे चूक आहे.

या दोन्ही संज्ञांमधील संबंध स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, अ) प्रभावातून सत्ता निर्माण होते तसे सत्तेतून ही प्रभाव निर्माण होत असतो. पं. नेहरूंच्या जबरदस्त प्रभावांतून त्यांच्या हाती सत्ता आली. तर इंदिरा गांधींच्या सत्ता वापराच्या पद्धतीमुळे त्यांचा प्रभाव निर्माण झाला असे म्हणता येईल. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर प्रभाव हा पुष्कळदा राजकीय सत्तेत रूपांतरित होतो तर राजकीय सत्ता पुष्कळदा प्रभावाची जननी ठरले असे म्हणता येईल. ब) प्रभाव असला म्हणजे त्याचे रूपांतर राजकीय सत्तेत होतेच

असे नाही आणि सत्ता हाती असली म्हणजे प्रभाव निर्माण करतो येतो असेही नाही. उदा. जयप्रकाश नारायण यांचा मोठा प्रभाव जनमानसावर होता पण त्यातून सत्ता प्राप्ती ही त्यांची इच्छाच नव्हती म्हणूनही निर्माण झाली असे नाही.[२१]

समाजातील साधनसामुग्री मर्यादित असते आणि ती मिळवण्याच्या व्यक्तींच्या समतांमध्ये प्रचंड तफावत असते ही दोन सामाजिक तथ्ये सर्वच वर्चस्व संबंधांच्या मुळाशी असतात. इथे 'साधनसामुग्री'चा अर्थ केवळ भौतिक साधनांपूरता मर्यादित नाही. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे वर्तन प्रभावीत करण्यासाठी ज्या-ज्या गोष्टींचा साधन म्हणून उपयोग करू शकते. त्या सर्व गोष्टी साधनसामुग्रीत अंतर्भूत आहेत. प्रभाव म्हणजे व्यक्तीची इतरांच्या धोरणांना हेतूत: परिणामित करण्याची क्षमता प्रभावधारक व्यक्ती समाजात सर्वच मूल्यांबाबत श्रेष्ठ मानली जाते. ती स्वत:च्या इच्छेनुरूप समाजातील अन्य व्यक्तींचे वर्तन परिणामित करते. म्हणजे एकतर, प्रभाव हा किमान दोन व्यक्तींच्या आंतरसंबंधांवर आधारित असतो आणि दुसरे असे की प्रभाव संबंध प्रस्थापित होण्यासाठी प्रभावधारकाचा हेतू महत्त्वाचा असतो. हेतूखेरीज प्रभाव म्हणताच येणार नाही.[२२] तेव्हा राजकीय प्रभाव ही संकल्पना अतिशय महत्त्वाची असून व्यक्ती आणि समाजावर जे विविध प्रभाव पडत असतात. त्यातूनच चळवळी, परिवर्तने, होत असतात. वरीलप्रमाणे संशोधनाच्या शीर्षकातील शब्दांचे-संकल्पनांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

या संशोधन कार्यात इतरही काही महत्त्वाच्या संकल्पना समजून घेतल्या पाहिजेत म्हणून त्यांचे विवेचन संक्षेपाने पुढिलप्रमाणे मांडले आहे.

### सामाजिक चळवळ (Social Movement) :

एक अशी चळवळ ज्यामध्ये लोक मोठ्या संख्येने एकत्र येऊन एखाद्या सामाजिक परिवर्तनासाठी किंवा एखादी सामाजिक दुष्प्रवृत्ती थांबविण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करतात. या चळवळीची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे - १) यामध्ये मोठ्या संख्येने लोक सामाजिक उद्दिष्टाने प्रेरित होऊन त्याच्या पूर्तीसाठी स्वेच्छेने सहभागी होतात. २) त्यांच्यामध्ये नेतृत्वशक्ती आपोआप उदयास येते. कधी-कधी समाजातील काही प्रबुद्ध लोक किंवा समाजसुधारक जनसामान्यांमध्ये जागृती घडवून त्यांना आंदोलनासाठी पातळीवर या कार्यासाठी अगदी किरकोळ संघटनाही पुरेशा असतात. यातूनच व्यापक चळवळी उभारतात.[२३]

### सामाजिक सुधारणा (Social Reforms) :

१९ व्या शतकापर्यंत भारतीय समाज, रुढी व परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान यांच्या गर्तेत अडकून पडलेला होता. अशा समाजाला या अज्ञानातून बाहेर काढण्याचे महत्त्वाचे बुद्धिवादी दृष्टिकोनातून सुशिक्षित वर्गाने केले. थोर समाजसुधारकांची एक परंपरा निर्माण झाली. प्रथम राजा राममोहन रॉय यांनी अद्वैतावर

आधारलेल्या मूर्तिपूजा न मानणाऱ्या पण केवळ वेदग्रंथ प्रमाण मानणाऱ्या एका संघटनेची स्थापना केली व कायद्याने सतीची चाल बंद करावयास भाग पाडते.

महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, म. फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर यांनी समाज सुधाणेचा प्रयत्न केला. न्या. रानड्यांनी प्रार्थना समाजाची स्थापना करून स्त्रियांचे परावलंबित्व, बालविवाह, विधवा विवाहास, स्त्रियांचे अज्ञान, पडदा पद्धती, भिन्न जातीत भोजनाला विरोध, परदेशागमनावर निर्बंध यासारख्या सामाजिक लांच्छनातून समाज मुक्त करण्यासाठी प्रयत्न केला. प. बंगालमध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या अथक परिश्रमांमुळे 'हिंदू विधवा विवाह कायदा' समिती बिटीश सरकारने स्थापन केली. तर असाच आश्रय मद्रास प्रांतात श्री. पंतलू यांनी काढला व अनाथ विधवांना आश्रय दिला. इंग्रजी मिशनऱ्यांनी मुलींसाठी तीन शाळा काढल्या. त्या शाळात कनिष्ठ वर्गाच्याच मुली शिकल्या. उच्च वर्णीयांनी आपल्या तेथे मुली पाठविल्या नाहीत. इ.स.१८३४ पर्यंत कलकत्यात शाळेत दोनशेपर्यंत मुली शिकत होत्या. महाराष्ट्र व मुंबई प्रांतात पडदा पद्धती नसल्यामुळे अनेक मुली शिकल्या. तसेच स्त्री बोध हे नियतकालिक सुरू केले. पुण्यात महात्मा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली व रमाबाई यांनी स्त्री शिक्षण व अनाथ महिलांच्या उन्नतीसाठी 'आर्य महिला सभा' ही संस्था काढली. महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षण या कार्याचे रोप महाराष्ट्रात लावले.

प्रस्थापित हिंदू व मुस्लिम समाजात मुलींचा जन्म अप्रिय असे. त्यामुळे अनेक अमानुष प्रकार निर्माण झाले. गुजरातमध्ये जाडेजा जमातीत दरसाल वीस हजार मुलींची हत्या केली जात होती व नवस फेडण्यासाठी मुलींना गंगापार करण्याची पद्धत बंगालमध्ये होती. या प्रकाराला आळा घालण्यासाठी 'बालहत्या प्रतिबंध कायदा' संमत करण्यात आला (१८७०). गुलामगिरीविरुद्ध 'इंडियन पिनल कोड' करण्यात आला.

महाराष्ट्रात बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर व जगन्नाथ शंकरशेठ यांनी परधर्मात गेलेल्यांना स्वधर्मात घेण्यासाठी शुद्धीकरणाची मोहीम राबविली. विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री पंडित यांचेही कार्य या क्षेत्रात उल्लेखनीय आहे. श्री. गजानन वैद्य यांनी 'हिंदू मिशनरी सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. याच काळात म्हैसूर संस्थानास 'बालविवाह प्रतिबंधक कायदा' करण्यात आला. २० व्या शतकाच्या प्रारंभी सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने महत्त्वाचे कायदे संमत झाले. सन १९१४ मध्ये 'हुंडा प्रतिबंधक कायदा' संमत करण्यात आला. परंतु ही प्रथा अजूनही चालू आहे. १९२३ सिव्हिल मॅरेजेस ॲक्ट संमत झाला. घटस्फोट कायदा संमत झाला. मुंबईत 'सेवासदन' नावाची संस्था स्थापन झाली. हिंदू विधवांची स्थिती सुधारणे हा उद्देश होता. बालविवाह प्रतिबंध करणारा कायदा १९२७ मध्ये (शारदा कायदा) पास करण्यात आला.

अस्पृश्यता निवारण करण्यासाठी सर्व समाजसुधारकांनी शर्थीने प्रयत्न केले. त्यात कर्मवीर वि. रा. शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' सुरू केले. तर प्रार्थना समाजाचे प्रमुख सर नारायण चंदावरकर यांनी

शिक्षणसंस्था, विहिरी, रस्ते, अस्पृश्यांसह सर्वांना खुले करण्यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यांना मंदिर प्रवेशासाठी व जाती–निर्मूलनासाठी समाजसुधारकांनी प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने समतेचे तत्त्व, समान हक्क, सामाजिक न्याय ही मूल्ये मान्य करून सर्वांना अधिकार दिले. राजर्षी शाहू महाराज, स्वा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पूज्य साने गुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री. गाडगे महाराज, श्री. तुकडोजी महाराज यांचाही समाजसुधारणा कार्यात मोठाच वाटा आहे.[२४]

## सामाजिक परिवर्तन :

अखंड परिवर्तनीयता हे आदिम अवस्थेपासून आजतागायतपर्यंतच्या सर्वच मानवी समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. स्थैर्य, सातत्य, चिरंतनत्व, निश्चितता, अनंतत्व वगैरे संकल्पनांचा कुणी कितीही पुरस्कार केला तरी चराचर सृष्टीतील परिवर्तनाचा नियम मानवी समाजालाही तितकाच लागू असतो. पोशाखापासून विचारप्रणालीपर्यंत सर्व क्षेत्रांत कमी–अधिक, तात्कालिन–चिरकालिक, अल्पगामी, दीर्घगामी, संस्थात्मक, आमूलाग्र, संथ व झपाट्याने असे परिवर्तन होतच असते. मानवी समाज हा कालप्रवाहाच्या साखळीतील दुवा असतो. अखंड घडण्याची ती प्रक्रिया असते. अंतिम फलनिष्पत्ती असे तिचे स्वरूप कधीच नसते.

सामाजिक परिवर्तन हा व्यापक सांस्कृतिक परिवर्तनाचा एक भाग असतो. कळी, भाषा, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान या सर्व व्यक्त–अव्यक्त सांस्कृतिक घटकांमध्ये होणाऱ्या बदलांचे परिणाम सामाजिक जीवनावर घडत असले तरी त्या सर्वांचा अंतर्भाव सामाजिक परिवर्तन या संज्ञेत होत नाही. समाजाच्या संरचनेत व कार्यात ज्या बदलांमुळे फेरफार होतात, तेच फक्त सामाजिक परिवत्रन म्हणावयास पात्र असतात. सामाजिक कृतीचे व आंतरक्रियांचे आकृतिबंध मूल्ये, सांस्कृतिक फलिते व प्रतीके या अविष्कारांसह मूलत: बदलण्याच्या म्हणजेच सामाजिक संरचनेत फेरबदल घडण्याच्या प्रक्रियेस ‘सामाजिक परिवर्तन’ म्हणतात.[२५]

## राजकीय व सामाजिक मूल्ये :

सामाजिक मूल्ये ही संकल्पना किंवा आदर्श सांस्कृतिक किंवा निव्वळ व्यक्तिगत अशा पातळीवर असणे शक्य असते. मूल्यांचा वापर, भावना, कल्पना, कृती (कृत्ये), गुण, वस्तू, क्षमवयस्क गट, सामाजिक समूह आणि ध्येये यांची परस्पर तुलना करण्यासाठी अथवा त्यांना मान्यता द्यावयाची की नाही यासाठीही केला जातो. मानवी मनात मूल्यांविषयी एक प्रकारची आपुलकी वा ममत्व आढळते. व्यक्तीने आणि समाजाने मूल्यांची बांधीलकी पत्करलेली असते. कारण मूल्यांमुळे व्यक्तीला सामाजिक व्यवस्थेद्वारा सामाजिक आंतरक्रियांशी एकात्मता साधण्यास साहाय्य होते. मूल्यांमुळे सामाजिक व्यवहारातील संघर्षाची

पूर्वकल्पना येऊन प्रसंगी ते संघर्ष सोडविण्यास मदत होते. सामाजिक मूल्यांच्या साच्यास मानवी वर्तनाचे सर्वसंमत मूल्यमापन करण्याची सोय होते. टॅलकॉट पार्सन्स यांच्या मते, 'मूल्य चौकटीमुळे' सामाजिक वर्तन आणि कृतीसाठी नियमने उपलब्ध होतात. मूल्यांचे पालन करण्यासाठी समाजाकडून प्रेरणा उत्तेजन आणि मार्गदर्शन केले जाते.

एखाद्या समाजातील आदर्श विचारप्रणाली (Ideology) आणि मूल्ये यांच्यात अतूट संबंध आढळतो. विचार-प्रणालीमध्ये कल्पना (Ideas) आणि नियमने (Norms) यांचे मिश्रण आढळते. सामाजिक विचारप्रणालीत त्या त्या समाजातील सर्वमान्य, सर्वस्वीकृत मूल्ये आणि उद्दिष्टे यांचा समावेश असतो. आधुनिक काळात राजकीय मूल्यांना विशेष प्राधान्य दिले जाते. उदा. बंधुत्व, राष्ट्रवाद, राष्ट्रनिष्ठा, मानवी स्वातंत्र्य, समान संधी, सर्व धर्म समभाव या मूल्यांचे राजकीय म्हणून वर्गीकरण केले. तरी त्यांचे सामाजिक महत्त्व स्वयंसिद्ध असते.

सामाजिक मूल्यांचे कार्य सामाजिक सहमती (Consensus) निर्माण करणे हे असू शकते. सामाजिक व्यवस्थेमध्ये सामान्य विचार आणि सहमतीमुळे समस्यांना सामोरे जाण्यासाठी तयारी करता येते. तशा परिस्थितीत समान मूल्ये, व्यवस्था आणि श्रद्धा असतील तर सामाजिक संस्थांच्या आणि सभासदांच्या भूमिका याविषयीची संदिग्धता कमी होण्यास हातभार लागतो. म्हणूनच कोणत्याही सामाजिक व्यवस्थेची अतूट अंगे म्हणून नियमनात्मक वर्तन-नियम आणि सांस्कृतिक मूल्ये यांच्याकडे पाहिले जाते.[२६]

## वर्णव्यवस्था :

### चार वर्णांवर आधारलेली समाजसंस्था –

हिंदू समाजाची रचना प्राचीन काळापासून चातुर्वर्ण्यावर आधारलेली आहे. त्यासंबंधीचे उल्लेख धर्मग्रंथांत विशेषत: स्मृतिग्रंथांत स्पष्ट केलेले आहेत. परमेश्वराच्या मुखातून ब्राह्मणांची उत्पत्ती झाली. बाहूपासून क्षत्रिय निर्माण झाले. ऊरुपासून वैश्यांची निर्मिती झाली आणि पायापासून शूद्र उत्पन्न झाले अशी ही चार वर्णांची उत्पत्ती धर्मग्रंथांत केलेली आढळते. वर्ण म्हणजे रंग असा अर्थ गृहीत धरला, तर या उत्पत्तीची अशास्त्रीयता स्पष्ट होते. त्याशिवाय, चार वर्ण म्हणजेच मूळ मानवगण होत. ते राहीत काही कल्पनेवर आधारलेले आहे. समाजाची विभागणी केवळ चार निरनिराळ्या रंगांच्या गटावर आधारलेली होती किंवा आहे, असे म्हणणे म्हणजे देशातील विविध भौगोलिक परिस्थिती, वातावरण आणि हवामान यांच्या परिणामाने केवळ चार वर्ण किंवा चार रंगांचेच मानवगट निर्माण होऊ शकतात, ही कल्पनाही बुद्धीला न पटणारी आणि प्रत्यक्षात न दिसणारी अशी आहे.

श्रेणीबद्ध वर्णव्यवस्था प्राचीन काळी किती प्रमाणात आणि कोणत्या स्वरूपात समाजस्वास्थ्याला उपयुक्त ठरली यावर मतमतांतरे आहेत. पण अशा चौकटीबद्ध वर्णव्यवस्थेमुळे सामाजिक विषमतेला फार मोठा आधार मिळाला ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवाला येते. शिवाय, या वर्णव्यवस्थेला अनेक फाटे फुटत गेल्यामुळे त्यातून अनेक जाती निर्माण झाल्या. अशी जातिसंस्था इ. स. पूर्व पाचव्या–सहाव्या शतकांच्या अगोदरपासून अस्तित्वात आहे. जातिभेदांच्या मुळाशी पावित्र्यावरील श्रद्धा आणि अपावित्र्याचे भय अशा भावना असाव्यात, असा एक विचार मांडला जातो. हे पावित्र्य किंवा अपावित्र्य आहाराशी निगडित झालेले आहे. भक्ष्य कोणते आणि अभक्ष्य कोणते हा विचारही वर्णभेदांच्या मागे असावा आणि मग तीच विचार अधिक विस्ताराने जातिभेदांच्या मागेही असावा. या पावित्र्याच्या आणि आहारविषयक विधिनिषेधाच्या कल्पनेशी उच्च व नीच जातीविषयक विषमता आणि त्याचीच परिणती म्हणून भिन्न जातीविषयक भिन्न आचारविचार दृढमूल होत गेले. त्यामुळे निरनिराळ्या वर्णांत लग्नसंबंध करण्याची प्रथा निषिद्ध मानली गेली. त्याला काही अपवाद असले, तरी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांच्यात विवाहसंबंध होऊ शकत नव्हते, ही वस्तुस्थिती गेली अडीच हजार वर्षे चालू आहे. धर्मग्रंथांचे सखोल संशोधन करणाऱ्यांना त्यात काही अपवाद आढळतीलही, पण अशा अपवादांवरून निरनिराळ्या वर्णांत विवाहसंबंध घडून येत होते असे सरसकट विधान करता येणार नाही आणि त्यामुळे वर्णव्यवस्थेतील विषम विभागणीचे समर्थनही करता येणार नाही. जातींच्या विभागणीसंबंधीही हेच विधान करता येईल.

**वर्ण आणि जाती यांच्या चौकटी –**

वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्थाही वंशपरंपरेने आजतागायत चालू आहे. या व्यवस्थांमध्ये वंशपरंपरेला महत्त्व द्यावे की गुणाला महत्त्व द्यावे याबाबतीत स्मृतिकारांमध्ये काही प्रमाणात मतभिन्नता दिसून आली, तरी अखेरीस वंशपरंपरेचा अभिमान अधिक दृढ होत गेला आणि गुणाचा विचार मागे पडला आणि वर्गाच्या चौकटी बनल्या आणि नंतर त्याचाच परिणाम म्हणून असंख्य जातींच्या चौकटी बनल्या. या जाती प्रथम व्यवसायानुरूप समाजाच्या सोयीसाठी बनल्या असाव्यात हे विधान काही प्रमाणात सयुक्तिक वाटले, तरी प्रत्येक व्यवसायातील निरनिराळ्या जातींत भोजनप्रतिबंध व विवाहप्रतिबंध का रूढ झाले याचे स्पष्टीकरण आढळत नाही. किंबहुना जाती–जातींत जे भेद मानले जातात त्याचे एक महत्त्वाचे लक्षण म्हणून भोजन प्रतिबंधाचा व विवाह प्रतिबंधाचा उल्लेख करत येईल. प्राचीन स्मृतिकालीन वर्णिकांत रोटी–बेटी व्यवहार चालत असते. त्याला प्रतिबंघ नव्हता, असे विधानही काही अपवादांवरच आधारलेले आहे. कारण रोटी–बेटी व्यवहाराला बंदी होती.

## वसाहतवाद :

**वसाहतीकडून साम्राज्याकडे –**

दुसऱ्या देशात जाऊन व तेथील काही प्रदेश मिळवून तेथून व्यापार करणे, त्या प्रदेशावर राजकीय प्रभुत्व स्थापन करणे आणि अशा सत्तेच्या जोरावर तेथील स्थानिक लोकांची पिळवणूक करणे, याला (Colonialism) असे म्हणतात हा प्रदेश वसाहत स्थापन करणाऱ्यांच्या मायभूमीपेक्षा वेगळा व अनेकदा भौगोलिकदृष्ट्या दूर असतो. त्या प्रदेशातील माणसे धर्म, वंश, वर्ण याबाबतीत भिन्न असणारे आढळतात. वसाहतवाले परकीय 'जेते' लोक स्थानिक लोकांनी आपल्यापेक्षा कमी दर्जाचे समजतात आणि मग त्या लोकांत सुधारणा करण्यासाठी आपण राज्य करीत आहोत, असे आपल्या वसाहतवादाचे समर्थन करतात. वसाहतवादातून नंतर साम्राज्याचा उदय झाला. या साम्राज्यवादातून पहिले व दुसरे अशी दोन विनाशकारी महायुद्धे उद्‌भवली. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक वसाहती स्वतंत्र झाल्या व अनेक स्वतंत्र देश उदयाला आले. पण त्यापूर्वी अनेक शतके पाश्चात्य राष्ट्रांनी आर्थिक संपन्नता व राजकीय प्रभुत्व मिळविण्यासाठी तसेच धर्मप्रचारासाठी व संस्कृतीच्या प्रसारासाठीही आशिया व आफ्रिका खंडांतील देश परतंत्र केले व वसाहतवादाचा उपयोग करून घेतला.

**आधुनिक वसाहतवाद –**

आधुनिक वसाहतवादाचा प्रारंभ सोळाव्या शतकापासून झाला. इ. स. १४८८ मध्ये दक्षिण आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्थान व इतर पौर्वात्य देशांमध्ये जाण्याचा समुद्रमार्ग युरोपियनांना सापडला. इ. स. १४९२ मध्ये कोलंबसला अमेरिकेचा शोध लागला व नव्या वसाहतवादाचा प्रारंभ झाला. युरोपीयन राष्ट्रांतील स्पर्धेचे क्षेत्र विस्तारले, नवेनवे प्रदेश मिळविण्यासाठी चुरस सुरू झाली. याच कालखंडात औद्योगिक क्रांती घडत होती. नव्या संशोधनाचा व या औद्योगिक प्रगतीचा वसाहतवाल्या राष्ट्रांना फायदा मिळाला. मोठ्या प्रमाणावर तयार होणाऱ्या मालाला वसाहतीत बाजारपेठ मिळाली व या उत्पादनाला लागणारा कच्चा माल वसाहतीत उपलब्ध होऊ लागला. अशा तऱ्हेने युरोपीय राष्ट्रांना सधन होण्याची, आधिपत्य मिळविण्याची अभूतपूर्व संधी मिळाली. त्याचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला, साम्राज्ये स्थापन केली आणि आपले विचार व संस्कृती यांचा प्रचार केला.[२७]

## ब्राह्मणेतर चळवळ :

**चळवळीची सामाजिक पार्श्वभूमी –**

आधुनिक ब्राह्मणेतर चळवळीचा उगम म. ज्योतीराव फुले व त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून झाला. उत्तर पेशवाईत 'शूद्रातिशूद्र' समाजावरील निर्बंध वाढले. कायस्थ प्रभू व मराठे यांना 'बेदोक्त' नाकारले गेले. अव्वल इंग्रजीत ब्राह्मणेतरांना सामाजिक स्वातंत्र्याचा व सार्वजनिक

शिक्षणाचा लाभ प्रथम झाला. अस्मिता जागृत झाली. स्वाभिमान निर्माण झाला व ब्राह्मणेतर वर्गाने ब्राह्मणांच्या सर्वांगिण वर्चस्वाविरुद्ध उठाव, बंड केले. हे अटळ होते.

निरक्षर अफाट शेतकरी समाज दुष्काळ, रोगराई व अवजड शेतसारा यामुळे जेरीस आला होता. शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जापायी सावकारांच्या घशात जाऊ लागल्या. शेतकऱ्यांनी सावकाराविरुद्ध चळवळ उभारुन इ. स. १८७५ मध्ये दंगे केले. याचाच परिणाम म्हणून 'डेक्कन ॲग्रीकल्चरल रिलिफ ॲक्ट' इ. स. १८८४ मध्ये मंजूर करावा लागला. ज्योतीरावांच्या आसूडाच्या निबंधामुळे मनस्वी जागृती झाली.

इंग्रज सरकारशी सहकार्याने वागून आपली सामाजिक प्रगती करता येईल. असा विश्वास ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी इ.स. १९३० पर्यंत बाळगला होता. 'सार्वजनिक सभा' व पुढील 'राष्ट्रीय सभा' वगैरे उच्चभ्रूंच्या उपक्रमापासून दूर राहून ब्राह्मणेतर चळवळ चालू राहिली. सत्यशोधक समाज व पुढील ब्राह्मणेतर या संज्ञेखाली झालेल्या विविध चळवळी सर्वथा भिन्न मानणे कठीण आहे. संस्थापक महात्मा फुले व संवर्धक शाहू महाराज यांच्या कार्याचे स्वरूप पाहता हे समजून येते. इतर जे ब्राह्मणेतर नेते व पुढारी कार्यकर्ते होते ते सत्यशोधक समाजाशी संबंधित असत. प्रथमत: ही चळवळ सामाजिक व धार्मिक समानता व स्वातंत्र्य तसेच समान हक्क व संधी प्राप्त करून घेयासाठी निर्माण झाली. जोशी वगैरे मध्यस्थ यांची गरज न ठेवता स्वकीय पुरोहितांकजून गृह्यविधी करण्याचे स्वातंत्र्य या चळवळीने पादाक्रांत केले. जोशी मंडळींना दक्षिणा वगैरे घेण्याचा कायदेशीर अधिकार नाही. असा निवाडा इ.स. १८९० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या अपिलात म. फुले व सत्यशोधक समाज यांनी मिळविला. पुढे इ.स. १९२६ मध्ये जोशी बिल मुंबई कौन्सिलमध्ये मंजूर झाले व दक्षिणेचा कायदेशीर हक्काचा शेवट झाला.

इ.स. १८७७ मध्ये विद्येत मागासलेल्या वर्गाच्या मागण्या, उणीवा व स्वतंत्र जाणिवा व्यक्त करण्यासाठी 'दीन बंधू'नामक साप्ताहिक निघाले. कै. कृष्णराव भालेकर यांनी शेतकऱ्यांची बाजू आमरण मांडली. कै. नारायणराव लोखंडे यांनी वरील साप्ताहिकाद्वारे मुंबईमधील कामगारांची बाजू मांडली व स्वतंत्र कामगार चळवळीचा जन्म झाला. त्यांना काही प्राथमिक महत्वाच्या सवलती मिळवून दिल्या. सरकारी राखीव जंगलात गुरे चारण्याची शेतकऱ्यांना परवानगी मिळवून दिली. मराठा व तत्सम विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळवून दिल्या. कै. सी. के. बोले वगैरेंनी ही कामगार चळवळ मुंबईतही चालू ठेवली होती व त्यांनी कामगारांच्या एका मोठ्या सभेत शाहू महाराजाचे व्याख्यान इस.स. १९१८ मध्ये आयोजित केले होते. कामगारांची बाजू शाहू महाराजांनी हिरीरीने मांडली व भांडवलशाहीचे दुष्परिणाम सांगितले. कै. दिनकरराव जवळकर यांनी इ.स. १९२० नंतर मुंबईला कामगारासाठी 'कैवारी' पत्र चालविले. पण याही चळवळीचा पवित्रा आरंभी इंग्रज सरकारशी 'राजनिष्ठ' राहण्याचा होता.

तथापि, ब्राह्मणेतर चळवळ सर्वांगीण मार्गाने चालली होती. कै. भालेकर यांनी 'दीन बंधू सार्वजनिक सभा' (इ.स. १८८४) स्थापन केली. तिच्यामार्फत शेतकऱ्यांच्या मागण्या व दु:खे सरकारपुढे व राष्ट्रीय सभेपुढेदेखील मांडण्यात आली. सत्यशोधक समाजाप्रमाणे ही सभा धर्मप्रकरणी विचार करीत नसे.

या चळवळीला 'ब्राह्मणेतर' ही संज्ञा इ.स. १९१५ नंतर प्राप्त झाली. इ.स. १८८० नंतर मराठा हा शब्द हरिजन व ब्राह्मण यांना सोडून जो त्या काळातील विद्येत मागासलेला वर्ग होता त्या वर्गाला वापरला जाऊ लागला. ज्योतीबांनी 'शूद्रातिशूद्र' ही दलितांसह ब्राह्मणेतरांसाठी योजलेली संज्ञा मागे पडली. चळवळीला उत्तरोत्तर विद्याप्रसारक स्वरूप येऊ लागले. पुण्याला 'डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन' व मुंबईला मराठा ऐकेच्छु सभा स्थापन होऊन गरीब मराठा व तत्सम विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याचा उपक्रम सुरु झाला. यानंतर इतर तत्सम जाती–जमातींनी त्यांच्या शिक्षण परिषदा भरविण्यात सुरुवात केली.

**ब्राह्मणेतर प्रक्षाची स्थापना –**

सत्तेवर येण्यासाठी इ.स. १९२० नंतर 'ब्राह्मणेतर पक्ष' मुंबई इलाख्यात स्थापन झाला. हा पक्ष इ.स. १९३५ पर्यंत कार्यरत होता. कमीत कमी पंधरा जागा तरी हा पक्ष पटकावीत असे. इ.स. १९२३ पासून ना. जाधवराव, ना. एस. टी. कांबळी आदी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना दिवाणगिरी देखील मिळाल्या. रावसाहेब, रावबहादूर वगैरे सरकारी किताब मिळाले. जिल्हा लोकल बोर्डस् ब्राह्मणेतरांच्या ताब्यात गेली, जाधव, लठ्ठे, बागडे, जेधे वगैरे वरिष्ठ कौन्सिलमध्ये निवडून आले. पूर्वी ब्राह्मणेतरांना त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधिक संस्थांमध्ये स्थान नव्हते. ते मिळविले गेले. तथापि राष्ट्रीय पक्षाप्रमाणे ब्राह्मणेतरांना सरकारी बिलांना विरोध करणे कठीण होते. मुलामुलींना सक्तीचे शिक्षण व्हावे म्हणून या पक्षाने कौन्सिलमध्ये व बाहेरही चळवळ केली. सरकारची आर्थिक क्षमता नसल्याने सक्तीचे शिक्षण झाले नाही. ब्राह्मणेतरांचा नोकरीत प्रवेश व्हावा, या उद्देशाला उत्तरोत्तर यश मिळत गेले व प्रमाणही ठरविण्यात आले. सार्वजनिक शाळा, विहीरी, पाणतळे येथे अस्पृश्यता पाळजी जाऊ नये असा निर्णय मुंबई कौन्सिलमध्ये घेण्यात आला. प्राथमिक शिक्षणाचा ताबा नगरपालिका व स्कूल ऑफ बोर्ड्स यांच्याकडे देण्यात आल्यावर खेड्यापाड्यातून निवडून आलेल्या प्रतिनिधींना ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण वाढविता आले. संमतीवयाचे बिल, बालविवाह प्रतिबंधक कायदा यांना ब्राह्मणेतरांनी पाठिंबा दिला.

विशेषत: मुंबई इलाख्यात चाललेली चळवळ मध्य प्रांत व वऱ्हाड, नागपूर व कर्नाटकातही पसरली. मद्रास इलाख्यात इ.स. १९१७ नंतर 'जस्टीस पार्टी' या नावाने ही चळवळ जोमाने पसरली. तामीळ, तेलगू व इंग्रजी भाषेत निघू लागली. डॉ. टी. एम. नायर, सर त्यागराज चेट्टी, श्री. रामस्वामी मुदलियार वगैरे नामवंत ब्राह्मणेतर मद्रासी पुढाऱ्यांशी शाहू महाराजांची व लठ्ठे–जाधवराव आदी मुंबई प्रांतिक पुढाऱ्यांची परस्परांची जानपहचान होती. शाहू महाराजांनी सिडनहॅम व नंतर लॉर्ड विलिंग्डन या गव्हर्नरांशी मैत्री संपादन करून त्यांचा उपयोग करून घेतला. शाहू महाराजांप्रमाणे मद्रासच्या ब्राह्मणेतर चळवळीला पानगलच्या संस्थानिकांचे नेतृत्व लाभले. जस्टीस पार्टीमधून द्रविड कळघम्, द्रविड मुन्नित्र कळघम् व अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम् अशा वंशभेद व भाषाभेदावर आधारित चळवळी सुरू झाल्या. अण्णा दुराई, रामस्वामी नायकर, करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन वगैरे नेते त्यांना लाभले.

**इंग्रजांनी उपयोग केला –**

शाहू महाराजांच्या पश्चात 'जेधे–जवळकर' यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मणेतर चळवळ क्रिया–प्रतिक्रियेच्या स्वरूपात आठ–दहा वर्षे चालू राहिली. अर्थात ही चळवळ अखिल भारतीय नव्हती. जस्टीस पार्टीची परिणती द्रविडीस्थान मागण्यापर्यंत झाली. तशी महाराष्ट्रातील सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळीची परिणती मुळीच झाली नाही. मध्य प्रांतात कै. पंढरीनाथ पाटील, आनंदस्वामी व डॉ. पंजाबराव देशमुख वगैरेंनी ब्राह्मणेतर चळवळ चालविली. निजामशाहीतही तिने प्रवेश केल्याचे उल्लेख मिळतात. स्वराज्यविषयक चळवळी रोखण्याच्या कामी इंग्रजांनी या चळवळीचा उपयोग करून घेतला.

**स्वराज्य चळवळीत भाग –**

इ.स. १९२२ मध्ये शाहू महाराज वारले आणि तत्पूर्वी १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. या दोन समकालीन शक्तींमध्ये दुर्दैवाने अंतर पडत गेल्याने ब्राह्मण–अब्राह्मण वाद घुमसत राहिला. इ.स. १९२९–३० नंतर म. गांधीजींचे असहकारी लढे सुरू झाले. अस्पृश्योद्धार इत्यादींबाबत गांधीजी पुरोगामी होते व गांधीजींनी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना विश्वासात घेतले. असा प्रयत्न पूर्वी झाला नव्हता. ब्राह्मणेतर पक्षाने ठराव करून स्वराज्यविषयक चळवळीत उडी घेण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. महर्षी शिंदे, जेधे, मोरे, बागडे, बागल वगैरे पुढारी सत्याग्रहात सामील होऊन तुरुंगातही गेले. खेड्यापाड्यातील शेतकरी ग्रामीण समाजाने त्यांना मोठ्या प्रमाणावर साथ दिली.

ब्राह्मणेतर पक्ष म्हणजे स्वराज्यविरोधी सरकारसामील, असा आक्षेप 'केसरी' घेत असे. या आक्षेपाचा अंत झाला. काँग्रेसमध्ये बहुजनसमाज घुसला व त्याने काँग्रेस व्यापली. हे घडल्यानंतर केसरी व तत्सम पक्ष काँग्रेसबाहेर पडला. इ.स. १९३५ नंतर 'ब्राह्मणेतर' ही संज्ञादेखील मागे पडली. या पक्षाचा उदय व विकास झाला, तशी अस्ताला जाण्यास कारणीभूत होणारी कारणेही घडली. मराठा समाजाचे पुढारी त्यांच्या समाजापुरते पाहू लागले. त्यामुळे मराठेतर रुष्ट झाले. ब्राह्मणेतर पक्षाला 'शेतकरी पक्ष' म्हणावे अशा काही सूचना हा पक्ष वाचविण्याच्या दृष्टीने आल्या. पण ब्राह्मणेतर पक्षाचे महाराष्ट्रातील प्रयोजनच संपल्यामुळे तो अस्ताला गेला. तरी शाहू महाराज व त्यांच्या ब्राह्मणेतर पक्षाने काले (जि. सातारा) येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेतून भाऊराव पाटील यांची 'रयत शिक्षण संस्था' उदयाला आली. तिने व इतर अनेक शिक्षण प्रसारक ब्राह्मणेतरांनी स्वावलंबनाने फार मोठ्या प्रमाणात शिक्षण प्रसार करण्यात यश मिळविले. स्वातंत्र्य मिळाल्यावर अर्थसहाय्य उपलब्ध झाल्यामुळे वरील प्रयत्नात भूमिती श्रेणीने भर पडली. सर्वच जीवनाच्या क्षेत्रात गुणदोष त्याबरोबर वाढले ती गोष्ट वेगळी. यातील काही नेत्यांनी शेतकरी–कामगार पक्षाची स्थापना १९४८ मध्ये केली.

शाहू महाराजांनंतर कै. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा समन्वयशील संघटक नेता बहुजन समाजाला मिळाला. पूर्वीप्रमाणे कटुता न वाढविता महाराष्ट्राची राजकीय सत्ता बहुजन समाजाच्या कब्जात

गेली. सहकारी चळवळीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. जिल्हा परिषदांमुळे ग्रामीण नेतृत्व शाहू महाराजांच्या काळापेक्षा प्रभावी ठरत आहे.[२८]

## १.१० संशोधनाची साधने :

सामाजिक शास्त्रातील संशोधनाची साधने ही विविध प्रकारची असतात. ज्यात परंपरागत साधने, आधुनिक साधने, अत्याधुनिक साधनांच्या आधारे संशोधन तेव्हा प्रस्तुत संशोधन हे म. ज्योतिराव फुले पूर्व कालखंडापासून ते आजच्या वर्तमानकाळापर्यंत या विषयावरील मूळ कागदपत्रे, नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची चरित्रे, त्यांनी लिहिलेले ग्रंथ मासिके आणि नियतकालिके, अधिवेशनांच्या पुस्तिका–स्मरणिका, समकालीन इतर संस्था–संघटना, व्यक्ती यांचे साहित्य, इतर लेखक, संशोधक यांचे लेखन आणि संशोधन प्रकाशित अप्रकाशित साहित्य, वर्तमानकाळातील या चळवळींशी संबंधित नेते, महनीय व्यक्ती, अभ्यासक, संशोधक यांच्या प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, तसेच विविध संस्था–संघटनांच्या कार्यालयांना, ग्रंथालयांना भेटी देऊन तेथे केलेला अभ्यास, मान्यवरांशी केलेली चर्चा अशा विविध प्रकारच्या साधनांचा उपयोग या संशोधन कार्यासाठी केलेला आहे.

सदरील प्रबंधामधून सत्यशोधक समाजाने अवलंबलेली सत्यशोधक चळवळींशी निगडित असणारी आणि सत्यशोधक चळवळींमध्ये उपेक्षित राहिलेली विचार परंपरा, विविध नियतकालिकांमधून आलेले विचार व मराठी वृत्तपत्रांचा समाजावर झालेला परिणाम त्या दृष्टीने जे जे उपलब्ध होईल त्या साधन सामुग्रींचा विचार केला जाणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा ज्योतिराव फुले यांचे साहित्य, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, भगवंतराव पालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, माधवराव विचारे, दिनकरराव जवळकर, भास्कर जाधव, खंडेराव बागल, माधवराव बागल, प्रबोधकनकार के. सी. ठाकरे आणि इतर नेते, कार्यकर्ते, पत्रकार, लेखक यांचे साहित्य प्रकाशित, अप्रकाशित यांचा सत्यशोधक समाजावर पडलेला राजकीय प्रभाव, त्यांची तत्त्वप्रणाली, नेतृत्व यातून समाजाची झालेली जडण–घडण याविषयीचा विचार आजपर्यंत झालेला नाही. त्याविषयी चा विचार प्रस्तुत संशोधनातून करण्यासाठी विषयाची निवड करून साधन सामुग्रीवर प्रकाश टाकण्याचा व अभ्यासण्याचा हा प्रयत्न आहे.

सदरील प्रबंधाचा विषय काही प्रकाशित–अप्रकाशित साहित्यामधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्रामुख्याने महात्मा फुले यांचे जीवन चरित्र आणि त्यांचे समग्र वाङ्मय, सत्यशोधक समाजाची नियतकालिके आणि वृत्तपत्रे, सत्यशोधकांच्या नोंदी, अ.भा. सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनांची यादी व

अखिल भारतीय सत्यशोधक समाजाच्या संघटनेने केलेले कार्य त्यात प्रामुख्याने १८८३ ते २००७ पर्यंत गृहीत धरलेले आहे. अखिल भारतीय सत्यशोधक समाजाची साहित्य संमेलने, सत्यशोधक समाजाविषयी विचार मांडणाऱ्या काही ज्येष्ठ विचारवंतांच्या मुलाखती, प्रश्नावली आदींच्या माध्यमातून सदरील प्रबंधाच्या प्रकाशित/अप्रकाशित साहित्यामधून हा विषय मांडण्याचा प्रयत्न आहे. आखिल भारतीय सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनाच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणांतून मांडलेले विषय हे समाजाला कसे प्रेरणा देणारे आहेत याचा विचार या प्रबंधामधून मांडण्यासाठीची ही व तत्संबंधी इतर उपलब्ध साहित्य ही या प्रबंधाची अभ्यास सामुग्री आहे. त्या अनुषंगाने प्रबंध लेखन करण्याची मुख्य दिशा आहे.

सत्यशोधक समाजाने आतापर्यंत दिलेले सामाजिक योगदान हे ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' या पध्दतीने ब्राह्मण्यवादाविरुध्द फुकलेले रणशिंग असून सामाजिक योगदानामध्ये असणारी भूमिका ही कशी निर्णायक आहे याचा विचार या प्रबंधातून प्रकर्षाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच सामाजिक हित जोपासणारी चळवळ व लिखित-अलिखित साहित्य ही या लेखनाची साधन सामुग्री असल्याने त्यातून वेगळा प्रकाश या संशोधनावर पडू शकतो.

अशा प्रकाशित/अप्रकाशित, संग्रहित, स्वत: शोधून विशेष स्वरूपाची साधन सामुग्री जमा करणे हा या प्रबंधाचा मूळ गाभा असून, त्याला सत्यशोधकीय साहित्य संमेलनांतील अध्यक्षीय भाषणे, नामांकित विचारवंतांच्या मुलाखती, वृत्तपत्रीय कात्रणे आदींचा अभ्यास करून संशोधन करण्यासाठी प्रस्तुत विषय निवडून वरील साधन सामुग्री अभ्यासावयाची आहे.

## १.११ संशोधन विषयाची प्रकरणनिहाय योजना :

हा संशोधन अभ्यास पुढील प्रकरणांमधून मांडला आहे.

महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांनी स्थापन केलेला 'सत्यशोधक समाज' याचे तत्त्वज्ञान, कार्य आणि त्यातून प्रेरणा घेऊन निर्माण झालेले नेतृत्व आणि त्याचा एकूणच महाराष्ट्रातील राजकारणावर व समाजावर झालेला दूरगामी परिणाम याचा शोध घेऊन त्याचे अहवाल लेखन एकूण सहा प्रकरणांच्या आधारे करण्यात आलेले आहे.

प्रास्ताविकापासून ते प्रबंधातील प्रकरणनिहाय योजना मांडून संशोधनकर्त्याने संशोधनाविषयीची प्रास्ताविक माहिती देऊन प्रबंध विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन

सामुग्री व संशोधन पद्धतीचा ऊहापोह केला आहे. सर्वसाधारणपणे प्रबंधाचा संकल्पित आराखडा खालीप्रमाणे विविध प्रकरणांमध्ये वर्गीकृत करण्यात आला आहे.

१. प्रस्तावना, संशोधनाचा विषय, पद्धती, उद्दिष्ट्ये व साहित्य सर्वेक्षण

२. १९ वे शतक – महात्मा फुले आणि समाज प्रबोधनाच्या चळवळी

३. सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली, वाटचाल आणि कार्य

४. सत्यशोधक समाजाचे नेतृत्व आणि योगदान

५. सत्यशोधक समाजाचा राजकीय – सामाजिक प्रभाव

६. सारांश व निष्कर्ष

संदर्भसूची – परिशिष्टे – अ) मूलभूत साहित्य, अभिलेख, अहवाल वगैरे ब) प्रकाशित अप्रकाशित ग्रंथ व पुस्तके आणि माहिती क) महत्त्वाची वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके इ. ड) प्रमुख सत्यशोधक इ) सत्यशोधक समाजाची घटना ई) इतर महत्त्वाची माहिती.

प्रस्तुत संशोधनकर्त्यांने १९ व्या शतकातील एकूण परिस्थिती सत्यशोधक समाजाद्वारे महात्मा फुले यांनी समाजाला दिलेला विचार, केलेली क्रांती याचा शोध घेतला आहे. या व अशा सर्व अभ्यासानंतर या विषयाच्या अनुषंगाने निष्कर्षांची नोंद करीत मूल्यमापनाकडे वळणे आवश्यक आहे. या चळवळीचा एकूण प्रभाव संपूर्ण जीवनावर कसा पडला याची या सर्वस्पर्शी अभ्यासातून हाती आलेली निरीक्षणे नम्रपणे येथे नोंदवीत आहे.

सदर संशोधनाद्वारे सत्यशोधक समाज व या समाजाने घडविलेल्या घटना व चळवळी इत्यादींचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा प्रबंध लिहीत असताना संशोधकासमोर जे जे प्रश्न उपस्थित झाले, ज्याचा ज्याचा उलगडा मला झाला ते ते इथे 'सत्यशोधक समाज, तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव' या शीर्षकाच्या प्रबंधामध्ये कमी–अधिक प्रमाणात संशोधकाने मांडण्याचा प्रयत्न केला असून, प्रत्येकाच्या मनोधर्मानुसार, विचारांनुसार त्यात बदल होऊ शकतो. कमी अधिकपणा जाणवू शकतो याची मला जाणीव आहे. त्याचा संशोधक मनापासून आदर करतो.

## १.१२ संशोधनाच्या मर्यादा आणि अनुभव :

सामाजिक शास्त्रातील संशोधनाला अनेक प्रकारच्या मर्यादा असतात. कारण हा विषय व्यक्तीच्या विचार आणि वर्तनाशी संबंधित असल्याने आणि त्यावर अनेक प्रकारचे प्रभाव पडत असतात. अनेक

घटनांचे परिणाम होत असतात. त्यामुळे इथे विज्ञान शाखेतील संशोधनाप्रमाणे प्रयोगशिलता आणि निश्चित निष्कर्ष काढता येत नाहीत. केवळ अनुमानाच्या आधारे काही निष्कर्ष काढता येतात. म्हणून या संशोधनातील पुष्कळसे काम ग्रंथालयीन साधनांच्या आधारावरच अवलंबून असते. तसेच चळवळीतील विविध टप्पे आणि त्यातील विविध व्यक्ती यांचेही मुल्यमापन निश्चितपणे करणे अवघड असते. म्हणून प्रस्तुत विषयाच्या संशोधन करताना अनेक प्रकारच्या मर्यादा पडलेल्या आहेत. पण हे संशोधन करताना आलेला अनुभव निश्चितच समाजप्रबोधनाच्या चळवळीच्या दृष्टीने उद्‌बोधक मार्गदर्शक असाच आलेला आहे. या संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्र राज्य अशी असल्याने संशोधनाची सामुग्री मिळवताना, अभ्यासकांच्या आणि चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतांना अतिशय चांगला अनुभव आला आणि सर्वांकडून उत्स्फुर्त असे सहकार्य मिळाले व या क्षेत्रात आणखी खूप काही कार्य करण्यासारखे आहे असे जाणवले.

* * *

**प्रकरण पहिले**

## संदर्भ सूची


१. मंगुडकर मा. प., महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, प्रकाशक – गजानन बुक डेपो, पुणे, दुसरी आवृत्ती, २६ जानेवारी १९६५, पृष्ठ १.

२. तत्रैव, पृष्ठ ५.

३. फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाड्मय, संपादक – सचिव – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती ५ वी – २८ नोव्हेंबर १९९१, पृष्ठ २६.

४. जरारे विजय, सामाजिकशास्त्राची संशोधन प्रणाली–अद्वैत प्रकाशन, अकोला, प्रथमावृत्ती २००४, पृष्ठे १, २.

५. खैरनार दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती – फेब्रुवारी २००९, पृष्ठ १ (मनोगत).

६. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक – महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, द्वितीय आवृत्ती १९८१, पृष्ठ १.

७. कुंभार नागोराव, अनभुले आनंद, महाराष्ट्रातील समाजशास्त्रीय चिंतन, (डॉ. द.ना. धनागरे यांच्या भाषणातील भाग), प्रकाशक – समाजशास्त्रीय परिषद, महात्मा बसवेश्वर कॉलेज, लातूर – १९९९, पृष्ठे १, २.

८. गर्गे स. मा., भारतीय समाजविज्ञान कोश, प्रकाशक – समाजविज्ञान मंडळ, पुणे, प्रथम आवृत्ती १९९०, पृष्ठ क्र. ४५०–५१.

९. कित्ता, पृष्ठ क्र. ४५०–५१.

१०. जोशी बी. आर., डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड–२, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००७, पृष्ठ क्र. १९८–१९९.

११. कित्ता, पृष्ठ क्र. ९९७.

१२. कित्ता, पृष्ठ क्र. ९९८.

१३. गाबा ओमप्रकाश, समाजविज्ञान कोश, पहिली आवृत्ती १९८४, प्रकाशक – बी.आर. पब्लिशिंग कॉर्पोरेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. १२२, १४८.

१४. तिजारे रा. अ., धांग्रेकर चिं. ग., आधुनिक राजकीय विश्लेषण, प्रकाशक – श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९४, पृष्ठ १९०.

१५. भोळे भा. ल., राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती ऑगस्ट १९८८, पृष्ठ क्र. १२० ते १२२.

१६. देवरे पी. डी., विसपुते, निकुंभ, राजकीय विचारप्रणाली, प्रकाशक – प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, प्रथम आवृत्ती –जून २००३, पृष्ठ क्र. ३–४.

१७. खेकाळे ना. रा., राजकीय नेतृत्व, प्रकाशक – श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९९, पृष्ठ क्र. १०.

१८. गर्गे स. मा., भारतीय समाजविज्ञान कोश, प्रकाशक – समाजविज्ञान मंडळ, पुणे, प्रथम आवृत्ती १९९०, पृष्ठ क्र. १५ ते १६.

१९. जोशी बी. आर., डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड–२, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती–२००७, पृष्ठ क्र. ११९९, १२००, १६७१, १६७२.

२०. भोळे भास्कर लक्ष्मण, राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती – ऑगस्ट १९८८, पृष्ठ क्र. ११३–११४.

२१. बोराळकर कृ. दि., आधुनिक राजकीय विश्लेषण, प्रकाशक – पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, पहिली आवृत्ती जून १९९२, पृष्ठ क्र. ७३.

२२. भोळे भास्कर लक्ष्मण, राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती ऑगस्ट १९८८, पृष्ठ क्र. ६८–६९.

२३. जोशी बी. आर., संपादक, डायमंड सामाजिक ज्ञानकोश – खंड–३, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पृष्ठ क्र. २०२४.

२४. जोशी बी. आर., संपादक, डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड–३, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पान क्र. २०२७ व २०२८.

२५. गर्गे स. मा., संपादक, भारतीय समाजविज्ञान कोश, समाजविज्ञान मंडळ, पुणे, आवृत्ती पहिली, जानेवारी १९९१, पान क्र. ३७ व ३८.

२६. गर्गे स. मा., संपादक, भारतीय समाजविज्ञान कोश, समानविज्ञान मंडळ, पुणे, आवृत्ती पहिली, जानेवारी १९९१, पान क्र. ४८.

२७. गर्गे स. मा., संपादक, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड –४, समाजविज्ञान मंडळ, पुणे, आवृत्ती पहिली, १९९०, पृष्ठ क्र. ३३२, ३३३.

२८. गर्गे स. मा., संपादक, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड–३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, आवृत्ती पहिली, १८८९, पृष्ठ क्र. ३६८ ते ३७०.

* * *